मासिक अंक
(खाजगी वितरण)

# महाआयटी संवाद

सहावा अंक - ऑगस्ट 2026

## मिनी सेतू केंद्र

### डिजिटल सुशासनाचा तळागाळातील नागरिकापर्यंत पोहोचणारा सेतू




**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...


**संपादकीय** 1
जीवनाला स्पर्शणारे तंत्रज्ञान

**मुखपृष्ठ कथा** 2
मिनी सेतू केंद्र : नागरिक आणि सेवांची सांगड

**सेवाव्रतीची कथा** 6
आपले सरकार सेवा केंद्र परिचालक सुधाकर लोकरे यांचा प्रेरणादायी प्रवास

**डिजिटल प्रशासनाची यशोगाथा** 8
आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक कमलेश मोहन बनले डिजिटल प्रशासनाचे दूत

**संवेदनशील प्रशासनाचा 'आधार'** 10
शंभर टक्के दिव्यांगत्व असलेल्या माउली फड यांची आधार नोंदणी यशस्वी
अंबाजोगाई तहसील प्रशासन आणि महाआयटी आधार केंद्राच्या समन्वयातून शासकीय योजनांच्या लाभाचा मार्ग सुकर

**सुरकुतलेल्या चेहऱ्यांवर समाधानाचे हासू** 13
ई-केवायसीच्या यशामुळे लातूरमधील वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणाली (GQMS)** 14
डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून शासकीय गृहनिर्माण व्यवस्थेत परिवर्तन

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील डेटा सेंटर्स** 17
हरित डेटा सेंटर्स, एआयसंबंधी स्वदेशी पायाभूत सुविधा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर करण्याचे, मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल यांचे आवाहन

**टेक गुरूवार** 19
अधिक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी सायबर मानसशास्त्राचा वेध

**क्षमता विकास** 21
समन्वयातून नेतृत्वाकडे : प्रभावी जिल्हास्तरीय अंमलबजावणीसाठी सक्षम जिल्हा समन्वयक

**सुशासनामागील बुद्धिमत्ता** 24
डेटा ॲनालिटिक्स ॲज अ सर्व्हिस (DAaS) च्या माध्यमातून महाराष्ट्र डेटा-आधारित शासन व्यवस्था उभारत आहे

**दिवंगत सुभाजित चक्रवर्ती यांच्या स्मृतीस विनम्र आदरांजली** 29



# संपादकीय


## भगवान पाटील

मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी


## जीवनाला स्पर्शणारे तंत्रज्ञान

आजच्या काळात डिजिटल परिवर्तन केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही. नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल परिवर्तनाची क्षमता विविध प्रकल्पांच्या निमित्ताने वारंवार अधोरेखित होते आहे. मात्र केवळ डिजिटल मंच तयार करण्यावर शासनाच्या यशाचे मोजमाप करता येणार नाही. मुंबईसारखे शहर असो वा गडचिरोलीमधील दुर्गम गावे, राज्याच्या प्रत्येक भागातील सर्वसामान्य नागरिकांना सन्मानाने, पारदर्शकतेने आणि सहजतेने शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात शासनाचे यश समावलेले आहे. हीच दूरदृष्टी महाराष्ट्र शासनाला आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित - महाआयटीला भविष्य-सज्ज, सर्वसमावेशक आणि नागरिक-केंद्रित डिजिटल परिसंस्था तयार करण्याच्या कामी मार्गदर्शन करत आहे.
महाआयटी संवाद'ची या महिन्याची आवृत्ती याच प्रवासाचा उत्सव साजरा करत आहे.

या अंकामध्ये तुम्हाला नवनिर्मितीच्या प्रेरक कथा वाचायला मिळतील. तंत्रज्ञान शासनाला अधिक प्रतिसादक्षम, कार्यक्षम आणि सुलभ सार्वजनिक सेवेत कशा प्रकारे रूपांतरित करत आहे, हे तुम्हाला या कथांमधून वाचता येईल. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समुदायांना शासकीय सेवा घरपोच उपलब्ध करून देणाऱ्या मिनी सेतू केंद्र उपक्रमापासून ते गृहनिर्माण वाटपात पारदर्शकता आणि कार्यक्षमतेचा अनोखा अनुभव देणाऱ्या शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणालीपर्यंत, नागरिकांना शासनाच्या केंद्रस्थानी ठेवणे, हा शासनाचा समान उद्देश सर्वच प्रकल्पांमधून अधोरेखित होतो आहे.

भविष्यासाठी सज्ज होण्याची महाराष्ट्राची वचनबद्धताही या अंकातील लेखांमधून जाणवते. 'टेक थर्सडेज' या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून वरिष्ठ शासकीय अधिकारी कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर्स, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, सायबर सुरक्षा आणि वर्तणूकशास्त्र अशा उदयोन्मुख तंत्रज्ञानाबाबत जाणून घेत आहेत. ही सत्रे धोरणकर्त्यांना तांत्रिक प्रगतीबरोबरच शासन, शाश्वतता आणि सार्वजनिक सेवा वितरणावरील त्याचे व्यावहारिक परिणाम समजून घेण्यासही मदत करत आहेत.

'आपले सरकार सेवा केंद्र' चालकांच्या प्रेरणादायी कथा हे या अंकाचे आणखी एक वैशिष्ट्य होय. प्रत्येक यशस्वी डिजिटल मंचामागे समर्पित व्यक्तींचे योगदान असते, जे तंत्रज्ञानाचा वापर करत शासकीय सेवा प्रदान करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करते. अशा व्यक्तींच्या अढळ वचनबद्धतेची आठवण करून देणाऱ्या या कथा आहेत. जेव्हा तंत्रज्ञानाला सहानुभूती, विश्वास आणि मानवी प्रयत्नांची जोड लाभते, तेव्हाच ते इच्छित हेतू साध्य करू शकते, याचा प्रत्यय या कथांमधून येतो.

डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात महाराष्ट्र आगेकूच करत असताना, डिजिटायझेशनच्या पलीकडे जात बुद्धिमान, शाश्वत आणि सर्वसमावेशक शासन हे सर्वोच्च उद्दिष्ट आपण बाळगले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर्स, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, सायबर सुरक्षा आणि सुरक्षित डिजिटल परिसंस्थेमुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक दृढ होत जाईल. तांत्रिक उत्क्रांतीच्या या काळात 'प्रत्येक नागरिकाला सेवा प्राप्त करण्याची समान संधी मिळाली पाहिजे', हे आमचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

महाआयटीच्या माध्यमातून आम्ही नागरिकांना सक्षम करणाऱ्या, संस्थांना बळकट करणाऱ्या आणि जनतेचा विश्वास वाढवणाऱ्या नवनिर्मितीला चालना देण्यासाठी कटिबद्ध आहोत. प्रत्येक डिजिटल उपक्रमाने मानवी जीवन सुलभ केले पाहिजे, संधी निर्माण केल्या पाहिजेत आणि शासन व नागरिक यांच्यातील दरी कमी केली पाहिजे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

जिथे तंत्रज्ञान हे सर्वसमावेशक विकास, पारदर्शक शासन आणि शाश्वत प्रगतीसाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल, अशा महाराष्ट्राची जडणघडण करण्याच्या कामी आम्ही योगदान देत आहोत. 'महाआयटी संवाद'ची ही आवृत्ती आमच्या वाचकांना माहिती देण्याबरोबरच डिजिटलदृष्ट्या सक्षम महाराष्ट्राच्या उभारणीत आमच्यासोबत योगदान देण्यास प्रेरित करेल, असा विश्वास मला वाटतो.
अनेक शुभेच्छा!!!

# मुखपृष्ठ कथा




## मिनी सेतू केंद्र : नागरिक आणि सेवांची सांगड

भारतातील नागरिकांसाठी शासनातर्फे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा प्रत्यक्षात किती नागरिकांपर्यंत पोहोचतात, यावरून गेली अनेक दशके या सेवांच्या यशाचे मोजमाप केले जाते आहे.

मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमध्ये शासकीय सेवा अगदी सहज ऑनलाइन उपलब्ध आहेत. डिजिटल प्रमाणपत्रे, ऑनलाइन अर्ज, बँकिंग सेवा आणि कल्याणकारी योजना या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. मात्र गडचिरोलीसारख्या जिल्ह्यातील अनेक दुर्गम गावांमध्ये अशा शासकीय सेवा किंवा प्रमाणपत्रे प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेकदा 30 ते 40 किलोमीटरचा प्रवास करावा लागत असे. एखादे उत्पन्न प्रमाणपत्र किंवा रहिवासी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी असंख्य आदिवासी कुटुंबातील नागरिकांना रोजंदारी सोडून, दूरवर प्रवास करावा लागत असे, प्रसंगी वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागत होत्या. शासकीय सेवांचा लाभ घेण्यातील हे आव्हान केवळ तांत्रिक नव्हते. ते भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिकसुद्धा होते.

दुर्गम भागातील नागरिकांच्या या समस्यांची दखल घेत महाराष्ट्र शासनाने 'लास्ट-माईल गव्हर्नन्स' या सर्वात नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत मिनी सेतू केंद्र प्रकल्प हाती घेतला आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने संकल्पित केलेले आणि गडचिरोली जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने महाआयटीच्या माध्यमातून राबविण्यात येणारे मिनी सेतू केंद्र, शासकीय सेवांचा लाभ प्रभावीरित्या नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या कामी यशस्वी ठरते आहे.

नागरिकांना शासकीय कार्यालयांपर्यंत प्रवास करायला लावण्याऐवजी, सरकारने शासकीय सेवा थेट त्यांच्या गावांमध्ये आणण्याचा निर्णय घेतला आहे. या साध्या कल्पनेमध्ये हजारो नागरिकांना दिलासा देण्याची क्षमता आहे.

### गडचिरोलीच्या परिवर्तनातील एक नवा अध्याय

गडचिरोली जिल्हा म्हणजे अनंत संधी आणि महत्त्वपूर्ण प्रशासकीय आव्हानांचा जिल्हा, असे चित्र आपल्या डोळ्यांसमोर सहज उभे राहते.

घनदाट जंगल, डोंगराळ प्रदेश आणि विखुरलेल्या आदिवासी वस्त्यांमध्ये पसरलेली अनेक गावे शहरी केंद्रांपासून भौगोलिकदृष्ट्या वेगळी आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या, या जिल्ह्याने डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांचाही अनुभव घेतला आहे, ज्यामुळे अनेक वर्षे या भागातील नागरिकांशी प्रशासकीय संपर्क साधणेसुद्धा कठीण झाले होते.

अलीकडच्या वर्षांत सुरक्षेच्या परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असली तरी सेवा वितरणाचे आव्हान मात्र अजून कायम आहे.

अनेक आदिवासी नागरिकांसाठी आजही तालुका मुख्यालयात जाणे म्हणजे जंगलातील रस्त्यांवरून लांबचा प्रवास करणे, त्यासाठी खर्च करावा लागणे आणि रोजंदारी गमावणे आहे.

जन्म दाखला असो, उत्पन्नाचा दाखला असो, निवृत्तीवेतनासाठी अर्ज असो, किंवा आधार अद्ययावत करणे असो.

काही काळापूर्वी या प्रत्येक सेवेसाठी केंद्रांना वारंवार भेट देणे आणि सतत प्रयत्न करणे आवश्यक होते. आदिवासी समाजासह अनेक समुदायांसाठी, शासकीय कल्याणकारी योजनांचे लाभ मिळवण्यातील हा सर्वात मोठा अडथळा ठरत असे. हाच अडथळा दूर करण्यासाठी मिनी सेतू केंद्रांची रचना करण्यात आली आहे.

डिजिटल प्रशासन म्हणजे केवळ ऑनलाइन पोर्टल तयार करणे नाही. प्रत्येक नागरिकाला त्या मंचाचा लाभ घेता येणे, हे महत्वाचे आहे. त्या दृष्टीने मिनी सेतू केंद्रे ही शासनाच्या पारंपरिक पद्धतीकडून नागरिक-केंद्रित पद्धतीकडे होणारे स्थित्यंतर दर्शवतात, जिथे

सुलभता हे मुख्य उद्दिष्ट ठरते. शासन केवळ प्रशासकीय इमारतींपुरते मर्यादित राहू नये, या तत्त्वाचे दर्शन या उपक्रमात घडते.

शासन प्रत्येक गावात दिसले पाहिजे. प्रत्येक नागरिकासाठी ते सुलभ असले पाहिजे, प्रत्येक गरजेला प्रतिसाद देणारे असले पाहिजे.

## मिनी सेतू मॉडेल

या प्रकल्पामध्ये हब-अँड-स्पोक रचनेचा अवलंब करण्यात आला आहे. संपूर्णपणे नवीन पायाभूत सुविधा उभारण्याऐवजी, शासनाने गडचिरोलीमध्ये आधीपासूनच कार्यरत असलेल्या सामुदायिक सुविधांचा उपयोग करून घेतला आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत (I T D P) कार्यरत असलेली नऊ आदि सेवा केंद्रे आणि तेरा पोलीस दादलारा खिडकी केंद्रे यांचे रुपांतर मिनी सेतू केंद्रांमध्ये करण्यात आले आहे.

यामुळे पायाभूत सुविधांवरील खर्च लक्षणीयरीत्या कमी होऊन जलद अंमलबजावणी शक्य होते आहे.

प्रत्येक मिनी सेतू केंद्र 'आपले सरकार पोर्टल'शी जोडलेले आहे आणि महाराष्ट्राच्या इ-प्रशासन परिसंस्थेचा डिजिटल-सक्षम विस्तार म्हणून कार्य करते आहे.

या केंद्राच्या माध्यमातून, नागरिक आता तालुका मुख्यालयात प्रवास न करता, आपल्या घराच्या अगदी जवळ शासकीय सेवांचा लाभ घेऊ शकतात.

महाआयटीचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील म्हणतात, "प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सहजतेने शासकीय सेवांचा लाभ घेता येतो, तेव्हाच डिजिटल प्रशासन अर्थपूर्ण ठरते. 'आपले सरकार' परिसंस्थेची व्याप्ती महाराष्ट्रातील सर्वात दुर्गम आदिवासी गावांपर्यंत वाढवून प्रशासनाला खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक बनवण्याच्या दृष्टीने मिनी सेतू केंद्रे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्यांना सेवांची सर्वाधिक गरज आहे, त्यांच्यापर्यंत त्या वेळेत पोहोचाव्यात, हे सुनिश्चित करण्याच्या महाआयटीच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे."

## पोलीस दादलोरा खिडकी कशासाठी?

पोलीस दादलोरा खिडकी केंद्रांना सार्वजनिक सेवा वितरणात समाविष्ट करणे, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य होय.

सुरुवातीला कायदा अंमलबजावणी संस्था आणि स्थानिक आदिवासी समुदाय यांच्यातील विश्वास दृढ करण्यासाठी स्थापन केलेली ही केंद्रे, हळूहळू नागरिक सहभागाचे प्रतीक बनली आहेत.

या विश्वासार्ह सामुदायिक केंद्रांना मिनी सेतू केंद्रांमध्ये रुपांतरित करून, सरकारने त्यांना शासन, लोककल्याण आणि डिजिटल सक्षमीकरणाच्या केंद्रांमध्ये बदलले आहे. मोठा सामाजिक प्रभाव निर्माण करण्यासाठी विद्यमान सार्वजनिक पायाभूत सुविधांचा पुनर्वापर कसा केला पाहिजे, हे यातून दिसून येते.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात भामरागड आणि एटापल्ली या अत्यंत दुर्गम तालुक्यांमध्ये 22 मिनी सेतू केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांसाठी सेवा प्राप्त करण्यातील सुलभता वाढवण्याच्या उद्देशाने धोरणात्मकदृष्ट्या योग्य ठिकाणी ही केंद्रे उभारण्यात आली आहेत.

सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेक तास प्रवास करावा लागत असे, त्याऐवजी सरकारने आता अत्यावश्यक सेवा त्यांच्या स्वतःच्या गावात किंवा गावाजवळ उपलब्ध होतील, याची खातरजमा केली आहे. महाराष्ट्रातील दुर्गम भागांपर्यंत घरपोच सेवा देणारा हा एक महत्त्वपूर्ण शासकीय उपक्रम आहे.

महाआयटीचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील म्हणतात, "मिनी सेतू केंद्रे ही केवळ सेवा वितरण केंद्रे नाहीत, तर ती सामाजिक परिवर्तनासाठी उत्प्रेरक आहेत. नागरिक आणि सरकार यांच्यातील अंतर कमी करून, स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण करून आणि डिजिटल समावेश मजबूत करून, ही केंद्रे अधिक सक्षम, परस्पर संलग्न आणि आत्मनिर्भर ग्रामीण महाराष्ट्राची पायाभरणी करत आहेत."

## शासकीय सेवा घरपोच

सर्वसमावेशक डिजिटल सेवा केंद्रे म्हणून मिनी सेतू केंद्रांची रचना करण्यात आली आहे.

आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून नागरिक अधिवास, जात, उत्पन्न, रहिवासी आणि जन्म प्रमाणपत्रे मिळवू शकतात.

ते महाआयडीसाठी नोंदणी करू शकतात, आधार-सक्षम सेवांचा लाभ घेऊ शकतात, विविध शासकीय कल्याणकारी योजनांअंतर्गत अर्ज सादर करू शकतात, त्याचबरोबर निवृत्तीवेतनाशी संबंधित सेवांचाही लाभ घेऊ शकतात.

ही केंद्रे बँकिंग आणि डिजिटल पेमेंट सुविधा देखील पुरवतात, ज्यामुळे आर्थिक समावेशन हा डिजिटल प्रशासनाचा एक महत्वाचा हेतू साध्य होतो.

विविध शासकीय कार्यालयांना वारंवार भेटी देण्याऐवजी, नागरिक आपल्याच गावात एकाच केंद्रात अनेक आवश्यक सेवा आणि योजनांचा लाभ घेऊ शकतात.

अनेक आदिवासी कुटुंबांसाठी हा प्रशासकीय दुर्गमतेपासून

प्रशासकीय सुलभतेकडे झालेला ऐतिहासिक बदल आहे.

निव्वळ तंत्रज्ञान समाजाचे परिवर्तन करत नाही. खऱ्या मानवी समस्या सोडवते, तेव्हाच तंत्रज्ञान अर्थपूर्ण ठरते.

मिनी सेतू केंद्रे डिजिटल पायाभूत सुविधा आणि मानवी सहाय्य यांच्यात ताळमेळ राखतात. स्थानिक आणि प्रशिक्षित संगणक परिचालक प्रत्येक केंद्र चालवतो, जो नागरिकांना अर्ज पूर्ण करणे, कागदपत्रे अपलोड करणे, डिजिटल सेवा प्रदान करणे आणि शासकीय योजना समजून घेणे यासाठी मदत करतो.

हे सहाय्यक-सेवा मॉडेल विशेषतः ज्येष्ठ नागरिक, प्रथमच डिजिटल माध्यम वापरणारे आणि मर्यादित डिजिटल साक्षरता असलेल्या आदिवासी समुदायांसाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञानाने लोकांची जागा घेण्याऐवजी, मिनी सेतू केंद्रे लोकांना सक्षम करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतात.

## ग्रामीण रोजगार निर्मिती

ग्रामीण रोजगाराच्या दृष्टिनेही हा उपक्रम अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

प्रत्येक मिनी सेतू केंद्र जिल्ह्यातील प्रशिक्षित परिचालकांची नियुक्ती करून स्थानिक उद्योजकतेच्या संधी निर्माण करते.

सुरुवातीच्या टप्प्यात सेवांच्या सुलभ कार्यान्वयनासाठी सरकारने एका वर्षासाठी प्रति परिचालक, प्रतिमाह ₹8,000 ची मदत मंजूर केली आहे.

परिचालकाच्या निवडीवर जिल्हाधिकारी देखरेख ठेवत असून, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, फर्निचर आणि डिजिटल उपकरणे यांसारख्या पायाभूत सुविधा राज्य सेतू सोसायटीमार्फत पुरवल्या जात आहे.

स्थानिक तरुण निव्वळ निष्क्रिय लाभार्थी न राहता, शासनामध्ये सक्रिय भागीदार बनतील, याची खातरजमा करणारा हा उपक्रम आहे.

## सेवाप्राप्तीच्या खर्चाची बचत

शहरी भागातील नागरिकासाठी अवघ्या काही मिनिटांत शासकीय प्रमाणपत्र मिळू शकते, मात्र गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी कुटुंबाला तेच प्रमाणपत्र मिळवण्यासाठी काही दिवस लागत होते.

वाहतुकीचा खर्च, गमावलेली मजुरी, वारंवार भेटी, चुकीची कागदपत्रे या सर्व छुप्या खर्चांचा सर्वाधिक फटका गरीब कुटुंबांना बसत होता. मिनी सेतू केंद्रांनी हे अदृश्य अडथळे दूर केले आहेत.

त्यामुळे हा प्रकल्प केवळ भौतिक अंतरच नाही, तर आर्थिक विषमताही दूर करतो आहे.

मिनी सेतू केंद्रांचा सर्वात महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम तंत्रज्ञानाच्या पलीकडे जात संवेदनशीलता जपणारा आहे.

हा परिणाम विश्वास दृढ करणारा आहे. शासकीय सेवा सुलभरित्या, वेळेवर आणि पारदर्शक पद्धतीने प्राप्त होतात, तेव्हा नागरिकांना शासन प्रतिसाद देणारे वाटते.

डिजिटल पद्धतीने प्रक्रिया केलेला प्रत्येक अर्ज सार्वजनिक संस्थांवरील विश्वास दृढ करतो. अशी प्रत्येक यशस्वी नोंदणी शासकीय योजनांवरील विश्वास वाढवते. स्थानिक पातळीवर जारी केलेले प्रत्येक प्रमाणपत्र एक शक्तिशाली संदेश देते की शासन हे भौगोलिक मर्यादांपुरते सिमित नाही, तर ते प्रत्येक नागरिकाचे आहे.

## सर्वसमावेशक डिजिटल महाराष्ट्राच्या दिशेने

मिनी सेतू केंद्र उपक्रम हा महाराष्ट्र शासनाच्या व्यापक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब आहे, ज्याद्वारे एक असा डिजिटल सर्वसमावेशक समाज निर्माण करायचा आहे, जिथे तंत्रज्ञान विषमता वाढवण्याऐवजी ती दूर करेल.

राज्यभरात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना, भौगोलिक परिस्थिती, गरिबी किंवा मर्यादित कनेक्टिव्हिटीमुळे कोणताही नागरिक मागे राहणार नाही, हे सुनिश्चित करण्यावर अधिकाधिक लक्ष केंद्रित होत आहे.

नवनिर्मितीमध्ये नेहमीच गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाचा समावेश असेलच असे नाही, कधीकधी, नागरिकांच्या गरजांनुसार प्रशासनाची पुनर्रचना करण्यातच नवनिर्मिती दडलेली असते, हे अधोरेखित करणारा हा उपक्रम आहे.

## राष्ट्रासाठी आदर्श

या प्रकल्पाची सुरुवात गडचिरोलीमध्ये 22 केंद्रांसह झाली असली, तरी त्याचे महत्त्व एका जिल्ह्यापुरते मर्यादित नाही.

मिनी सेतू मॉडेल एक अशी विस्तारक्षम चौकट प्रदान करते, जिची प्रतिकृती महाराष्ट्रातील दुर्गम, आदिवासी, डोंगराळ आणि महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये आणि अखेरीस संपूर्ण भारतात तयार केली जाऊ शकते.

डिजिटल इंडिया, सर्वसमावेशक प्रशासन आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचवण्याच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत असणारा हा उपक्रम आहे.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित होत राहतील, तसतशी मिनी सेतू केंद्रे टेलिमेडिसिन, डिजिटल शिक्षण, कृषी सल्ला सेवा, एआय-सक्षम नागरिक सहाय्य, आर्थिक समावेशन, कौशल्य

विकास कार्यक्रम आणि ग्रामीण उद्योजकता यांना एकाच मंचावर एकत्रित करू शकतील.

महाराष्ट्र हे भारतातील डिजिटलदृष्ट्या सर्वात सक्षम राज्य बनण्याच्या दिशेने आपला प्रवास सुरु ठेवत असताना, मिनी सेतू केंद्र उपक्रम हा एक महत्वाचा संदेश देतो. शासनाचे खरे यश हे तंत्रज्ञान किती प्रगत होते यावर मोजले जात नाही, तर ते तळागाळातील नागरिकांचे जीवन किती सुलभ करते यावर त्याचे मोजमाप होते. गडचिरोलीमधल्या दुर्गम जंगलात त्या परिवर्तनाची सुरुवात झाली आहे.









# सेवाव्रतीची कथा



## आपले सरकार सेवा केंद्र परिचालक सुधाकर लोकरे यांचा प्रेरणादायी प्रवास

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातल्या टाका गावात जेमतेम 3,000 लोक राहतात. तिथल्या नागरिकांसाठी मूलभूत शासकीय सेवांचा लाभ मिळवणे, हे एके काळी मोठे आव्हान होते. 2011 सालापर्यंत साधी फोटोकॉपी घेण्यासाठी किंवा सरकारी कामे पूर्ण करण्यासाठी गावकऱ्यांना जवळपास 22 किलोमीटर प्रवास करावा लागत असे. आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक सुधाकर लोकरे यांनी या गावात 'महा ई-सेवा केंद्र' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. शासकीय सेवांचा लाभ या वंचित नागरिकांपर्यंत पोहोचवणे, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता.

त्यांचा हा प्रवास खडतर होता. इंटरनेट कनेक्टिव्हिटी जवळपास अस्तित्वातच नव्हती, संथ गतीच्या टू-जी नेटवर्कवर सिम कार्ड आणि यूएसबी डोंगल वापरून सेवा पुरवल्या जात होत्या. प्रत्येक ऑनलाइन अर्जासाठी संयम, चिकाटी आणि तांत्रिक कौशल्याची कसोटी लागत होती. मात्र शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना सन्मानाने घेता आला पाहिजे, या वचनबद्धतेसह लोकरे यांनी आपले काम सुरू ठेवले.

2013 साली या प्रवासात एक महत्त्वपूर्ण वळण आले, जेव्हा लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्याच कार्यालयात आधार नोंदणी केंद्र स्थापन करण्यात आले. या जबाबदारीमुळे लोकरे यांचे सेवा केंद्र हे प्रशासन आणि ग्रामीण नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा बनले. जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन, महाआयटी आणि विविध शासकीय विभागांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्यामुळे, हे केंद्र या भागातील सर्वात विश्वासार्ह नागरिक सेवा केंद्र बनले.

2020 साली हे आधार केंद्र औसा येथील पंचायत समितीच्या शासकीय आवारात स्थलांतरित करण्यात आले. अधिकृत शासकीय ठिकाणाहून नव्या उमेदीने कामकाज सुरू केल्यामुळे जनतेचा विश्वास वाढला, आणि जास्त सेवांचे वितरणही शक्य झाले. नागरिकांची वाढती गर्दी आणि त्यामुळे होणारी गैरसोय लक्षात घेत लोकरे यांनी टोकन-आधारित प्रणाली सुरू केली. या दूरदर्शी निर्णयामुळे सुव्यवस्थित, पारदर्शक आणि नागरिक-स्नेही पद्धतीने शासकीय सेवांचे वितरण सुनिश्चित झाले.

गेल्या काही वर्षांपासून, या केंद्राने शासन आपल्या दारी, शाळा प्रवेश मोहीम, अंगणवाडी पोहोच कार्यक्रम आणि विशेष आधार शिबिरे अशा मुख्य शासकीय उपक्रमांना सक्रियपणे पाठिंबा दिला आहे, ज्यामुळे शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचू शकल्या आहेत. ज्यांना शासकीय कार्यालयांपर्यंत पोहोचणे कठीण असते, असे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या उपक्रमांचा विशेष फायदा झाला आहे.

मात्र सुधाकर लोकरे यांनी प्रदान केलेल्या सेवांच्या संख्येपेक्षा, ज्या सहृदयतेने ते सेवा प्रदान करतात, ते या केंद्राचे वैशिष्ट्य आहे.

सेवा शुल्क परवडत नसलेल्या नागरिकांना त्यांनी अनेकदा विनामूल्य सेवा प्रदान केल्या आहेत. भारतीय सशस्त्र दलातील जवानांना कोणतेही शुल्क न आकारता ते सेवा प्रदान करतात. राष्ट्राचे रक्षण करणाऱ्यांना सर्वतोपरी आदर दिला पाहिजे, हा त्यांचा



विचार खरोखरच अनुकरणीय आहे. त्यांच्या या विचारसरणीमुळे नागरिकांशी विश्वासाचे बंध निर्माण झाले आहेत, आणि त्याच विश्वासाच्या बळावर अनेक कुटुंबे या केंद्राकडे येत आहेत.

सुमारे वीस वर्षांपासून अंथरुणाला खिळलेले विष्णू बनसोडे यांचा अनुभव या ठिकाणी आवर्जून नमूद करण्याजोगा आहे. अंथरुणाला खिळल्यामुळे, आपला प्रलंबित पगार पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली आधारची औपचारिकता त्यांना पूर्ण करता येत नव्हती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, लोकरे यांनी स्वतः त्यांच्या घरी भेट दिली आणि आधार अद्ययावत करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. वरकरणी ही एक नियमित प्रशासकीय प्रक्रिया वाटत असली तरी विष्णु बनसोडे यांच्या दृष्टीने ती अनमोल ठरली. आधार अद्यतन शक्य झाल्यामुळे त्यांना आर्थिक सुरक्षा मिळालीच, आणि त्यांचा आत्मसन्मान सुद्धा अबाधित राहिला. हे केवळ आधार तपशील अद्ययावत करण्याचे काम नव्हते, तर एका नागरिकाला आत्मसन्मानाने जगण्याचा हक्क परत मिळवून देण्यासारखे होते, असे उद्गार लोकरे यांनी काढले.

दृष्टिबाधित पती आणि वाचादोष असलेल्या त्यांच्या पत्नीच्या संदर्भातील त्यांचा अनुभवही जाणून घेण्यासारखा आहे. अर्थपूर्ण सहजीवन जगणाऱ्या या दाम्पत्याची आधार-संबंधित सर्व कामे सुरळीतपणे पूर्ण होतील, असा विश्वास, सुधाकर लोकरे यांनी दिला. त्यांच्या सक्रिय सहाय्यामुळे या दाम्पत्याला कोणत्याही त्रासाशिवाय आवश्यक शासकीय सेवा मिळण्यास मदत झाली. या विलक्षण कुटुंबाची प्रेरणादायी कहाणी आणि आधार केंद्रामार्फत मिळालेला सहानुभूतीपूर्ण पाठिंबा, 'सकाळ' या मराठी दैनिकात ठळकपणे प्रसिद्ध झाला. नागरिक-केंद्रित सेवा वितरणामुळे वंचितांचे जीवनमान उंचावणे शक्य होते, हे अधोरेखित करणारा हा अनुभव होता.

हे अनुभव निव्वळ किस्से नाहीत. "सेवा म्हणजे केवळ कागदपत्रांवर प्रक्रिया करणे नाही, तर विश्वास, सहानुभूती आणि माणुसकीवर आधारित नातेसंबंध निर्माण करणे होय," या विचारानुसार आचरण करणारे लोकरे यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख घडवणारे हे प्रसंग आहेत. तब्बल तेरा वर्षांपेक्षा जास्त काळ लोकरे या सेवेत कार्यरत आहेत. आपल्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना ते म्हणतात, मी केवळ कागदपत्रांची पूर्तता केली नाही, तर विश्वास आणि करुणेचा हात पुढे करून मानवी नातेसंबंध निर्माण केले आहेत.

या केंद्राने आतापर्यंत तब्बल 10 ते 11 लाख नागरिकांना आधार-संबंधित सेवा प्रदान केल्या आहेत. त्याचबरोबर विविध योजना आणि विभागांतर्गत 5-6 लाखांपेक्षा जास्त शासकीय सेवांचे व्यवहार सुलभ केले आहेत. मात्र ही आकडेवारी फार महत्वाची नाही. आपल्या केंद्रातून ज्यांना सेवांचा लाभ मिळाला, त्यांचे जगणे सोपे झाले, सुसह्य झाले, जीवनमान उंचावले, यातच सगळे आले, अशी भावना लोकरे यांनी व्यक्त केली आहे.

नागरिक सेवा आणि मानवतावादी प्रशासन जपण्याच्या कामी त्यांच्या योगदानाचा गौरव करत, महाआयटीनेही त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे, आणि त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाला आपल्या मासिक वार्तापत्रात समाविष्ट केले आहे. या प्रवासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना लोकरे यांनी जिल्हा प्रशासन, महाआयटीचे अधिकारी, प्रकल्प अधिकारी, सहकारी आणि स्थानिक नेतृत्व यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपल्या या प्रवासात त्यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मोलाचे ठरल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

सुधाकर लोकरे यांची ही कथा महाआयटीच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' उपक्रमाच्या व्यापक दृष्टीकोनाचे दर्शन घडवते. केवळ तंत्रज्ञान प्रशासनात परिवर्तन घडवू शकत नाही, डिजिटल कार्यक्षमतेला मानवतेची जोड देणाऱ्या परिचालकांच्या समर्पणामुळेच प्रशासन खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक बनते, हे लोकरे यांच्या अनुभवांवरून दिसून येते.

अत्यंत समर्पक शब्दांत आपल्या भावना व्यक्त करताना लोकरे म्हणतात, "सेवा हे केवळ कर्तव्य नाही. सेवा प्रदान करण्याच्या पूर्ततेची आस हृदयाला असली पाहिजे. पोकळ शब्दांतून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून माणुसकी व्यक्त होत असते."



# डिजिटल प्रशासनाची यशोगाथा



## आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक कमलेश मोहन बनले डिजिटल प्रशासनाचे दूत

ग्रामीण महाराष्ट्रातील लक्षावधी नागरिकांसाठी शासकीय सेवांचा लाभ घेणे आता अप्राप्य राहिलेले नाही. या परिवर्तनामागे आपले सरकार सेवा केंद्राचे हजारो समर्पित परिचालक आहेत, जे डिजिटल प्रशासनाचा दूत म्हणून कार्यरत आहेत. श्री. कमलेश मोहन राऊत हे असेच एक परिचालक असून 16 जानेवारी 2012 पासून अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात वाळवड येथील 'आपले सरकार सेवा केंद्रा'द्वारे ते नागरिकांना शासकीय सेवा प्रदान करत आहेत.

ऑनलाइन शासकीय सेवांचा लाभ देण्याचा 14 वर्षांपेक्षा जास्त अनुभव असणारे कमलेश राऊत यांचे केंद्र केवळ एक डिजिटल सेवा किऑस्क नाही. त्यांच्या केंद्रात नागरिकांना केवळ शासकीय सेवाच मिळत नाहीत तर उचित मार्गदर्शन मिळते आणि आपले काम नक्की होईल, असा दिलासासुद्धा मिळतो.

डिजिटल प्रशासनाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील नागरिकांना ऑनलाइन सेवांबद्दल फारशी माहिती नव्हती. इंटरनेट कनेक्टिव्हिटी विश्वासार्ह नव्हती, डिजिटल साक्षरता मर्यादित होती आणि नागरिक अनेकदा अत्यावश्यक शासकीय कामासाठी सुद्धा तंत्रज्ञानाचा वापर करण्यास कचरत असत. या मर्यादा लक्षात घेत कोणत्याही वयाच्या, कोणतीही शैक्षणिक किंवा आर्थिक पार्श्वभूमी असणाऱ्या नागरिकांना महाराष्ट्राच्या वाढत्या डिजिटल प्रशासन परिसंस्थेचा लाभ मिळत राहावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार कमलेश राऊत यांनी केला.

एका लहानशा सेवा केंद्रापासून सुरू झालेला हा प्रवास आता या भागातील सर्वात विश्वासार्ह सार्वजनिक सेवा केंद्रांपर्यंत पोहोचला आहे. दररोज असंख्य शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, मजूर आणि छोटे उद्योजक उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधार-संबंधित सेवा, निवृत्तीवेतन, शिष्यवृत्ती, भूमी अभिलेख, रोजगार नोंदणी आणि असंख्य नागरिक कल्याणकारी योजनांसह विविध शासकीय सेवांचे लाभ प्राप्त करण्यासाठी या केंद्राला भेट देतात.

प्रत्येक नागरिकाला आदरपूर्वक, पारदर्शक पद्धतीने आणि वेळेवर सेवा मिळण्याचा हक्क आहे, या तत्वानुसार काम करणारे कमलेश यांनी गेल्या काही वर्षांत इथल्या स्थानिकांचा विश्वास संपादन केला आहे.

कमलेश राऊत यांची कार्यपद्धती केवळ अर्ज प्रक्रियेपुरती मर्यादित नाही. अनेक ज्येष्ठ नागरिक डिजिटल प्रक्रियेबाबत अनभिज्ञ असतात, ऑनलाइन प्रक्रिया त्यांना अनेकदा भीतीदायक वाटतात. अशा नागरिकांना कमलेश कामाच्या प्रत्येक टप्प्याबाबत संयमाने समजावून सांगतात, त्यांना कागदपत्रांची प्रक्रिया समजून घेण्यास मदत करतात आणि ते आत्मविश्वासाने केंद्रातून बाहेर पडतील याची खातरजमा करतात. या केंद्रात, शिष्यवृत्ती आणि प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जांना विलंब होऊ शकणाऱ्या चुका टाळण्यासाठी काळजीपूर्वक मार्गदर्शन केले जाते. तर शेतकऱ्यांना त्यांच्या उपजीविकेवर थेट परिणाम करणारे शासकीय लाभ प्राप्त व्हावेत यासाठी आवश्यक मदत केली जाते.

आपत्कालीन परिस्थितीत उपलब्धता हे कमलेश यांच्या सेवेचे आणखी एक वैशिष्ट्य होय. रुग्णालयात दाखल होताना आवश्यक असलेल्या तातडीच्या प्रमाणपत्रांसाठी नागरिकांना मदत करणे असो, शैक्षणिक प्रवेशासाठी महत्त्वाची कागदपत्रे मिळवून देणे असो, किंवा शासकीय लाभांसाठी अर्ज करताना उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्या सोडवणे असो, त्यांनी नेहमीच आपल्या वेळेपेक्षा नागरिकांच्या हिताला जास्त प्राधान्य दिले आहे.

कमलेश राऊत यांच्या केंद्राने ग्रामीण महाराष्ट्रात डिजिटल समावेशाचा विस्तार करण्याच्या उद्देशाने अनेक शासकीय मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. जनजागृती मोहीम आणि नागरिकांच्या निरंतर सहभागामुळे, हजारो रहिवासी ऑनलाइन शासकीय सेवा सहज वापरू लागले आहेत, ज्यामुळे मध्यस्थांवरील आणि शासकीय कार्यालयांच्या भेटींवरील त्यांचे अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी झाले आहे.

कमलेश यांच्यासाठी तंत्रज्ञान हे नागरिकांना प्रभावी **पद्धतीने** सेवा देण्याचे एक साधन आहे. त्यांच्या कार्यातून नागरिकाभिमुख शासनाचा आत्मा दिसून येतो, जिथे डिजिटल मंचाला सहानुभूती, संयम आणि वैयक्तिक वचनबद्धतेची जोड लाभते.

## अनुभवाचे बोल

सार्वजनिक सेवेचे खरे मोजमाप त्यातून लाभ मिळवणाऱ्यांच्या अनुभवांतून दिसून येते. असंख्य नागरिकांनी, गेल्या अनेक वर्षांपासून, वाळवड येथील या आपले सरकार सेवा केंद्रातून मिळालेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

श्रीमती सुनीता शिंदे म्हणतात, "माझ्या मुलीच्या कॉलेज प्रवेशासाठी मला तातडीने उत्पन्नाचा दाखला मिळवायचा होता. कमलेश सरांनी संपूर्ण प्रक्रिया तातडीने पूर्ण केली आणि प्रत्येक टप्प्यावर मला मार्गदर्शन केले. त्यांनी वेळेवर केलेल्या मदतीमुळे, माझ्या मुलीला कोणताही विलंब न होता प्रवेश मिळाला."



"ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे ऑनलाइन प्रक्रिया मला अवघड वाटतात. मात्र या केंद्राला मी भेट देतो, तेव्हा कमलेश संयमाने सर्व काही समजावून सांगतात आणि माझी समस्या सोडवल्याशिवाय मला जाऊ देत नाहीत. मला नेहमीच आदराची वागणूक मिळते."
– बबनराव जाधव, ज्येष्ठ नागरिक

रमेश पवार हे लाभार्थी शेतकरी आहेत, ते म्हणतात, "एका शासकीय योजनेसाठी अर्ज करण्यासाठी मला अनेक कागदपत्रांची आवश्यकता होती. प्रक्रिया माहीत नसल्यामुळे मी काळजीत होतो. कमलेश सरांनी सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण केली आणि मला वारंवार फेऱ्या मारायला न लावता माझे लाभ मिळतील याची खातरजमा केली."

"एखादी महत्त्वाची शासकीय योजना किंवा शिष्यवृत्ती उपलब्ध असली की कमलेश सर आम्हाला कळवतात आणि विद्यार्थ्यांना त्यांचे अर्ज योग्यप्रकारे भरण्यास मदत करतात. त्यांच्या मार्गदर्शनाचा आमच्या गावातील अनेक तरुणांना फायदा झाला आहे."
— पूजा मोरे, कॉलेज विद्यार्थिनी

हे अभिप्राय केवळ कार्यक्षम सेवा वितरणच नव्हे, तर सेवा केंद्र आणि समुदाय यांच्यात निर्माण झालेला विश्वासही दर्शवितात.

## एक विश्वसनीय डिजिटल दुवा

समर्पित व्यक्ती डिजिटल प्रशासन चालवतात, तेव्हा ते किती प्रभावी ठरते, हे वाळवड आपले सरकार सेवा केंद्राच्या कामातून दिसून येते. तब्बल चौदा वर्षांच्या अविरत सेवेतून, कमलेश मोहन राऊत यांनी सरकार आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्यास मदत केली आहे, आणि तंत्रज्ञान अर्थपूर्ण स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचेल याची खात्री केली आहे.

भौगोलिक मर्यादांच्या पलिकडे जात प्रत्येक नागरिकापर्यंत पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम पद्धतीने शासकीय सेवा पोहोचवणे, या महाआयटीच्या दृष्टीकोनाला पुरक असे या केंद्राचे कार्य आहे.

आज, हे केंद्र केवळ प्रमाणपत्रे प्राप्त करण्याचे किंवा अर्ज सादर करण्याचे ठिकाण नाही. ते विश्वसनीयता आणि लोकसेवेचे प्रतीक आहे. प्रत्येक यशस्वी अर्ज एका नागरिकाचे प्रतिनिधित्व करतो, ज्याचे जीवन या केंद्रामुळे निश्चितच सोपे झाले आहे. इथे निरसन झालेली प्रत्येक समस्या डिजिटल प्रशासनावरील जनतेचा विश्वास दृढ करते. तंत्रज्ञानाला करुणा आणि सचोटीची जोड लाभते तेव्हा ते जीवनात लक्षणीय परिवर्तन घडवून आणते, हा विश्वास प्रत्येक समाधानी लाभार्थीच्या मनात दृढ होतो.

ई-प्रशासनाचे खरे यश पूर्ण झालेल्या व्यवहारांच्या संख्येवरून नव्हे, तर अधिक समृद्ध आणि समाधानी नागरिकांच्या संख्येवरून मोजले जाते. समर्पण, व्यावसायिकता आणि नागरिक सेवेप्रती असलेल्या अढळ वचनबद्धतेच्या माध्यमातून कमलेश मोहन राऊत उद्योजकांच्या पुढील पिढीला प्रेरणा देत आहेत आणि महाराष्ट्राच्या तळागाळापर्यंत डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याच्या कामी अमूल्य योगदान देत आहेत.

# संवेदनशील प्रशासनाचा ‘आधार’



## शंभर टक्के दिव्यांगत्व असलेल्या माउली फड यांची आधार नोंदणी यशस्वी

**अंबाजोगाई तहसील प्रशासन आणि महाआयटी आधार केंद्राच्या समन्वयातून शासकीय योजनांच्या लाभाचा मार्ग सुकर**

शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा खरा अर्थ तेव्हाच अधोरेखित होतो, जेव्हा त्या समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतात. एखाद्या गरजू नागरिकाला योजनेचा लाभ मिळवून देणे म्हणजे केवळ प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे नव्हे; तर त्याच्या जीवनाला सुरक्षिततेचे बळ देणे, त्याचा शासन व्यवस्थेवरील विश्वास दृढ करणे आणि सन्मानाने जगण्याच्या त्याच्या अधिकाराला पाठबळ देणे होय. अंबाजोगाई येथील शंभर टक्के दिव्यांगत्व असलेल्या माउली फड यांच्या आधार नोंदणीची कहाणी याच संवेदनशील, नागरिककेंद्री आणि माणुसकीपूर्ण प्रशासनाची प्रचिती देणारी आहे.

आजच्या तंत्रज्ञानाधिष्ठित व्यवस्थेत आधार क्रमांक ही केवळ ओळख सांगणारी संख्या नसून, शासनाच्या विविध योजना, सामाजिक सुरक्षा कार्यक्रम, आर्थिक साहाय्य, आरोग्यविषयक सेवा आणि अन्य लोकोपयोगी सुविधांशी नागरिकांना जोडणारा तो महत्त्वाचा दुवा ठरला आहे. विशेषतः दिव्यांग, निराधार, ज्येष्ठ नागरिक आणि समाजातील वंचित घटकांसाठी आधार नोंदणी ही शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभापर्यंत पोहोचण्याची पहिली पायरी बनली आहे. मात्र, काही नागरिकांसाठी ही पहिली पायरीच अनेक अडचणींनी भरलेली असते. शारीरिक मर्यादा, जैवमितीय नोंदीतील अडथळे (माहितीच्या नोंदणी व पडताळणी प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक किंवा व्यवहार्य समस्या), योग्य छायाचित्र घेण्यात येणाऱ्या अडचणी आणि प्रक्रियेविषयी पुरेशा मार्गदर्शनाचा अभाव यांमुळे त्यांना वारंवार प्रयत्न करावे लागतात.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील माउली फड आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही अशाच परिस्थितीतून जावे लागले. माउली यांना शंभर टक्के दिव्यांगत्व आहे. त्यांच्या शारीरिक अडचणींमुळे दैनंदिन जीवनात अनेक मर्यादांना सामोरे जावे लागत असतानाच आधार कार्ड उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आणि अत्यावश्यक सुविधांचा लाभ घेण्यातही अडथळे निर्माण झाले होते. पात्रता असूनही केवळ आवश्यक ओळख नोंदणी पूर्ण होऊ शकली नसल्याने शासकीय साहाय्यापर्यंत पोहोचणे त्यांच्यासाठी कठीण झाले होते.

संजय गांधी निराधार अनुदान योजना, दिव्यांग व्यक्तींना आवश्यक साधने व उपकरणे खरेदी करण्यासाठी आर्थिक साहाय्य देणारी योजना तसेच दिव्यांग साहाय्यक पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक होता. माउली यांच्या उदरनिर्वाहाला हातभार लावणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ मिळावा, ही त्यांच्या कुटुंबाची विशेष अपेक्षा होती. मात्र, आधार नोंदणी पूर्ण होत नसल्याने या योजनेसाठी पुढील प्रक्रिया करणे शक्य होत नव्हते. शासनाने योजना उपलब्ध करून दिली होती, पात्र लाभार्थीही समोर होते; परंतु त्या दोघांना जोडणारा आधारचा दुवा अद्याप निर्माण झाला नव्हता.

माउली यांच्या पालकांनी आधार नोंदणीसाठी यापूर्वी तीन ते चार वेळा प्रयत्न केले होते. प्रत्येक वेळी आशा घेऊन ते नोंदणीसाठी जात; मात्र तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक अडचणींमुळे नोंदणी पूर्ण होत नसे. शंभर टक्के दिव्यांगत्वामुळे माउली यांच्या हातांचे ठसे घेणे, नोंदणीसाठी आवश्यक स्थितीत त्यांना बसविणे आणि योग्य पद्धतीने छायाचित्र घेणे ही प्रक्रिया तुलनेने आव्हानात्मक होती. एकामागोमाग एक प्रयत्न अयशस्वी होत असतानाही त्यांच्या कुटुंबाने हार मानली नाही. शासनाच्या योजनांचा आधार माउलींपर्यंत पोहोचावा, यासाठी त्यांची धडपड सुरूच होती.

अनेक प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने माउली यांचे पालक अंबाजोगाई तहसील कार्यालयात पोहोचले. त्यांनी नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांची भेट घेऊन माउली यांच्या आधार नोंदणीची अडचण त्यांच्यासमोर मांडली. एका दिव्यांग नागरिकाला आधारअभावी शासनाच्या योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब लक्षात येताच बाहेती यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली. केवळ समस्येची नोंद घेऊन न थांबता, त्यांनी माउली यांना तहसील

कार्यालयातील आधार नोंदणी केंद्रात नेण्याची आणि त्यांची नोंदणी प्राधान्याने पूर्ण करण्याची तत्काळ व्यवस्था केली.

प्रशासकीय कामकाजात नियम, कार्यपद्धती आणि तांत्रिक आवश्यकता यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. तथापि, या सर्वांबरोबरच नागरिकांच्या अडचणीकडे संवेदनशीलतेने पाहण्याची वृत्ती असेल, तर प्रशासनाचा खरा लोकाभिमुख चेहरा समोर येतो. माउली यांच्या प्रकरणात हाच दृष्टिकोन अनुभवास आला. त्यांच्या शारीरिक अडचणींचा विचार करून आधार नोंदणीची प्रक्रिया शक्य तितकी सुलभ करण्यात आली. त्यांना अनावश्यक प्रतीक्षा करावी लागू नये आणि पुन्हा एकदा निराश होऊन परतावे लागू नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया प्राधान्याने राबविण्यात आली.

"दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार आवश्यक आहे. माणुसकीचे नाते जपत अधिकारी म्हणून आपले कर्तव्य पूर्ण करणे, हाच या हस्तक्षेपामागील उद्देश होता," अशी भावना नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांनी व्यक्त केली. त्यांच्या या भूमिकेमध्ये लोकसेवेचे मूलभूत तत्त्व सामावलेले आहे. पदाच्या अधिकाराचा उपयोग केवळ कार्यवाहीसाठी नव्हे, तर एखाद्या गरजू व्यक्तीच्या जीवनातील अडथळा दूर करण्यासाठी झाला, तर प्रशासनाविषयी नागरिकांच्या मनात निर्माण होणारा विश्वास अधिक दृढ होतो.

तहसील कार्यालयातील महाआयटी आधार नोंदणी केंद्राचे चालक संतोष मोहिते आणि कर्मचारी संतोष साखरे यांनीही माउली यांची परिस्थिती समजून घेत नोंदणीची जबाबदारी अत्यंत काळजीपूर्वक पार पाडली. दिव्यांग नागरिकांची आधार नोंदणी करताना अनेकदा जैवमितीय तपशील नोंदविण्याशी संबंधित अडचणी उद्भवतात. हातांचे ठसे स्पष्टपणे घेता न येणे, योग्य छायाचित्र टिपण्यासाठी व्यक्तीला अपेक्षित स्थितीत बसविणे शक्य न होणे किंवा शारीरिक हालचालींवरील मर्यादांमुळे नोंदणीसाठी अधिक वेळ लागणे, अशा अडचणींचा सामना केंद्रचालकांना करावा लागतो. अशा वेळी तांत्रिक ज्ञानासोबतच संयम, सहानुभूती आणि परिस्थितीनुरूप कार्य करण्याची तयारी आवश्यक असते.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना तसेच जिल्हा समन्वयकांकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचनांनुसार माउली यांची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि पडताळणी करण्यात आली. माउली यांना नोंदणीच्या ठिकाणी व्यवस्थित आणि सोयीस्कर रीतीने बसविण्यात आले. त्यांच्याशी आत्मीयतेने संवाद साधत, कोणतीही घाई न करता आवश्यक तपशील नोंदविण्यात आले. त्यांच्या दिव्यांगत्वामुळे येणाऱ्या अडचणींकडे प्रक्रियेतील अडथळा म्हणून न पाहता, त्या अडचणी दूर करण्यासाठी कोणती मदत करता येईल, या सकारात्मक दृष्टिकोनातून केंद्रातील कर्मचाऱ्यांनी काम केले.

अंबाजोगाई तहसील कार्यालयातील आधार केंद्रात दिव्यांग नागरिकांना सुलभरीत्या ये-जा करता यावी, यासाठी व्हीलचेअर आणि अन्य साहाय्यभूत साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. दिव्यांग नागरिकांना केंद्रात आल्यानंतर योग्य जागा, आवश्यक साहाय्य आणि सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, याकडेही विशेष लक्ष दिले जाते. सेवासुविधा निर्माण करताना केवळ भौतिक उपलब्धता पुरेशी नसते; त्या सुविधांचा नागरिकांना सन्मानाने आणि सहजपणे उपयोग करता आला पाहिजे. माउली यांच्या नोंदणीच्या वेळी या तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्याचे दिसून आले.

केंद्रचालक आणि कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांनंतर माउली यांची आधार नोंदणी यशस्वीरीत्या पूर्ण झाली. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांच्या हस्ते त्यांना नोंदणीची पावती देण्यात आली. अनेक प्रयत्नांनंतर हातात आलेली ती पावती माउली आणि त्यांच्या पालकांसाठी केवळ एका शासकीय प्रक्रियेची पोहोच नव्हती. ती त्यांच्या दीर्घ प्रतीक्षेला मिळालेली सकारात्मक फलश्रुती होती. शासनाच्या योजनांच्या लाभापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आता सुकर होणार असल्याचा दिलासा त्या पावतीने त्यांच्या कुटुंबाला दिला.



या नोंदणीमुळे माउली यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेसह पात्रतेनुसार दिव्यांग नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अन्य योजनांसाठी अर्ज करण्याचा मार्ग खुला झाला आहे. आवश्यक आधार क्रमांक प्राप्त झाल्यानंतर सामाजिक सुरक्षा, आर्थिक साहाय्य, साधने व उपकरणांसाठी मदत तसेच विविध शासकीय सेवांशी संबंधित पुढील प्रक्रिया करणे त्यांना सुलभ होणार आहे. आधार नोंदणीने माउली यांच्या सर्व अडचणी तत्काळ संपणार नसल्या, तरी शासकीय योजनांच्या लाभापर्यंत पोहोचण्यामधील एक महत्त्वाचा अडसर निश्चितपणे दूर झाला आहे.

आज शासनाच्या अनेक सेवा डिजीटल माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत. या व्यवस्थेमुळे सेवा वितरण अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम होत आहे. तथापि, तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेव्हाच सिद्ध होतो, जेव्हा शारीरिक, सामाजिक किंवा आर्थिक अडचणी असलेल्या नागरिकांनाही त्याचा समान लाभ घेता येतो. डिजीटल व्यवस्थेमध्ये सर्वसमावेशकता नसेल, तर समाजातील काही घटक विकासाच्या प्रवाहापासून दूर राहण्याची शक्यता असते. त्यामुळे

दिव्यांग नागरिकांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन नोंदणी प्रक्रिया, सेवा केंद्रांवरील सुविधा आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अधिक सक्षम करणे आवश्यक ठरते.

दिव्यांग नागरिकांची आधार नोंदणी सुलभ करण्यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण आणि शासनाकडून स्पष्ट, अद्ययावत आणि परिस्थितीनुरुप मार्गदर्शक सूचना नियमितपणे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात असतो. विशेष प्रकारचे दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींची जैवमितीय माहिती नोंदविताना कोणती कार्यपद्धती अवलंबावी, पर्यायी व्यवस्था कशी करावी आणि संबंधित नागरिक व त्यांच्या पालकांना कोणते मार्गदर्शन द्यावे, याबाबत आधार केंद्रचालकांना सातत्याने प्रशिक्षण देण्यासाठी विशेष पावले उचलण्यासाठी नियोजन आराखडा बनविण्याचे काम सुरु आहे. यासह, जिल्हा आणि तालुकास्तरावरील समन्वय अधिक प्रभावी करण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे जेणेकरुन अशा प्रकरणांमध्ये आवश्यक निर्णय वेगाने घेता येतील.

आधार नोंदणीची आवश्यकता असलेल्या दिव्यांग नागरिकांची स्थानिक स्तरावर माहिती संकलित करून त्यांच्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करणे, तहसील कार्यालयातील आधार केंद्रांवर त्यांना प्राधान्य देणे तसेच आवश्यकतेनुसार सुलभ नोंदणीची व्यवस्था उपलब्ध करून देणे, अशा प्रयत्नांतून कोणताही पात्र नागरिक आधारअभावी शासनाच्या योजनांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेता येऊ शकते. अंबाजोगाई तहसील प्रशासनाने आधार नोंदणीची मागणी केलेल्या दिव्यांग नागरिकांना तहसील कार्यालयातील केंद्रावर नोंदणीसाठी येण्याचे आवाहन केले आहे. हा उपक्रम केवळ नोंदणीची संख्या वाढविणारा न राहता, पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांच्या मुख्य प्रवाहाशी जोडणारा ठरु शकतो.

माउली यांना मिळालेल्या मदतीमुळे त्यांच्या कुटुंबाचा आधार केंद्र आणि शासनव्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अधिक सकारात्मक झाला. त्यांची अडचण समजून घेत प्रशासनाने पुढाकार घेतला आणि उपलब्ध नियमांच्या चौकटीत मार्ग काढला, तर त्याच्या मनात शासनाविषयी आत्मीयता आणि विश्वास निर्माण होतो. माउली यांच्या आधार नोंदणीने हाच विश्वास अधोरेखित केला.

या संपूर्ण प्रक्रियेत नायब तहसीलदार स्मिता बाहेती यांची तत्परता, महाआयटी आधार केंद्राचे चालक संतोष मोहिते आणि कर्मचारी संतोष साखरे यांचे तांत्रिक कौशल्य, जिल्हास्तरीय समन्वयातून मिळालेले मार्गदर्शन तसेच माउली यांच्या पालकांची सातत्यपूर्ण धडपड या सर्व घटकांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. प्रशासन, तंत्रज्ञान आणि मानवी संवेदना यांचा योग्य समन्वय साधला, तर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली एखाद्या नागरिकाची समस्या अल्पावधीत मार्गी लागू शकते, हे या घटनेतून स्पष्ट होते.

माउली फड यांची आधार नोंदणी ही एका व्यक्तीपुरती मर्यादित असलेली घटना नाही. समाजातील दिव्यांग आणि वंचित नागरिकांसाठी डिजीटल सेवा अधिक सुलभ, समावेशक आणि संवेदनशील करण्याचा संदेश या घटनेत दडलेला आहे. शासनाची योजना कितीही व्यापक असली, तरी तिचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेला पहिला दुवा नागरिकाला उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे असते. हा दुवा निर्माण करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी आपली जबाबदारी कर्तव्यभावनेने पार पाडतात, तेव्हा प्रशासनाला मानवी चेहरा प्राप्त होतो.

माउली यांच्या हातात देण्यात आलेली आधार नोंदणीची पावती हा एका प्रक्रियेचा शेवट नाही; उलट, शासनाच्या कल्याणकारी योजनांशी जोडल्या जाणाऱ्या त्यांच्या नव्या प्रवासाचा प्रारंभ आहे. एका बाजूला शासनाची डिजीटल व्यवस्था, दुसऱ्या बाजूला संवेदनशील प्रशासन आणि या दोहोंना जोडणारी माणुसकीची भावना, या त्रिसूत्रीने माउली यांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण केला आहे. शासनाच्या लोककल्याणकारी वाटचालीत तंत्रज्ञान हे साधन असले, तरी नागरिकाचा सन्मान आणि त्याच्या जीवनात घडणारा सकारात्मक बदल हेच त्या वाटचालीचे अंतिम ध्येय आहे. अंबाजोगाईतील या प्रयत्नाने त्या ध्येयाची आश्वासक अनुभूती दिली आहे.



# सुरकुतलेल्या चेहऱ्यांवर समाधानाचे हासू



## ई-केवायसीच्या यशामुळे लातूरमधील वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

नागरिकाभिमुख सेवांच्या संदर्भात, डिजिटल प्रशासनामुळे पूर्ण झालेल्या व्यवहारांच्या संख्येची मोजदाद करण्याऐवजी, त्यामुळे लोकांचे जीवन कसे आणि किती सोपे झाले, आणि लाभ प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर हास्य कसे फुलले, याची दखल घेणे जास्त महत्वाचे आहे. तंत्रज्ञान आणि समर्पित वृत्ती यांच्या सुयोग्य ताळमेळातून सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात कशा प्रकारे परिवर्तन घडू शकते, हे लातूर जिल्ह्यातील शिवनी खुर्द या गावातील एका प्रेरणादायी उदाहरणातून नव्याने अधोरेखित झाले आहे.

विविध शासकीय सेवांसाठी अनिवार्य असणारी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, हे अनेक ज्येष्ठ शेतकऱ्यांसाठी अनेकदा मोठे आव्हान ठरते. वयोमानानुसार येणारा थकवा, अशक्तपणा, परिणामी मर्यादित हालचाल, बायोमेट्रिक प्रमाणीकरणाशी संबंधित समस्या आणि एकट्याने प्रवास करण्यातील असमर्थता हे ज्येष्ठ नागरिकांना शासकीय लाभांपासून वंचित ठेवणारे मुख्य घटक ठरतात. अनेकदा ई-केवायसीची अंतिम मुदत गाठता न आल्यास, त्यांच्या उपजीविकेला आधार देणारी आर्थिक मदत मिळण्यास विलंब होऊ शकतो.

या समस्येची दखल घेत, महाआयटीचे ग्रामस्तरीय उद्योजक उमाकांत किसनराव पारगे यांनी अशा वयोवृद्ध शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पुढाकार घेतला. भल्या पहाटे कामाला सुरुवात करून त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक लाभार्थ्याची मदत केली, आणि त्यांना कोणताही त्रास न होता ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण होईल, याची खातरजमा केली.

थेट लाभ प्रदान योजनेतील एका डिजिटल प्रक्रियेची पूर्तता, एवढ्यापुरता हा पुढाकार मर्यादित नव्हता. आपली ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाल्याची खात्री मिळाली, तेव्हा या ज्येष्ठ नागरिकांचे चेहरे समाधानाने उजळून निघाले. आपल्याला शासकीय लाभ मिळत राहिल, आणि आर्थिक सुरक्षा अबाधित राहिल, याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यांवर दिसू लागले.

या अनुभवी, सुरकुतलेल्या चेहऱ्यावरचे समाधानाचे हास्य, हे महाआयटी टीमसाठी सर्वात मोठे बक्षीस होते. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाची ई-केवायसी पडताळणी यशस्वीरित्या पूर्ण करून डिजिटल सार्वजनिक सेवा सुलभ, सर्वसमावेशक आणि नागरिकाभिमुख करण्याप्रति त्यांची वचनबद्धता दिसून आली. गरजूंपर्यंत लाभ वेळेत पोहोचवते, तेव्हाच तंत्रज्ञान अर्थपूर्ण ठरते, हे या उपक्रमावरून सिद्ध होते.

हा हृदयस्पर्शी उपक्रम महाराष्ट्राच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात ग्रामस्तरीय उद्योजकांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करणारा आहे. तळागाळात अथकपणे काम करणारे हे ग्रामस्तरीय उद्योजक (VLEs) प्रगत तंत्रज्ञान आणि ग्रामीण नागरिक यांच्यात दुवा साधतात, त्याचबरोबर भौगोलिक स्थान किंवा वयाचा विचार न करता, प्रत्येक घरापर्यंत शासकीय सेवा पोहोचतील, याची खात्री करतात.

लोकसेवा केवळ तंत्रज्ञानाने नव्हे, तर करुणा, वचनबद्धता आणि बदल घडवण्याच्या प्रामाणिक इच्छेने प्रेरित असते, हे उमाकांत किसनराव पारगे यांच्या उदाहरणावरून दिसून येते. महाराष्ट्र आपली डिजिटल प्रशासकीय व्यवस्था अधिक मजबूत करत असताना, ई-प्रशासनाचे खरे यश प्रणाली किंवा सॉफ्टवेअरमध्ये नसून, नागरिकांच्या जीवनात प्रतिबिंबित होणारा आनंद, आत्मविश्वास आणि सन्मानात आहे, हे या उपक्रमामुळे अधोरेखित होते आहे. या वयोवृद्ध शेतकऱ्यांचे समाधानाचे हास्य हीच महाआयटीच्या अथक प्रयत्नांची सर्वोत्तम पोचपावती आहे.

# शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणाली (GQMS)

## डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून शासकीय गृहनिर्माण व्यवस्थेत परिवर्तन

सुशासनाचे मोजमाप करण्यासाठी केवळ सरकारी धोरणे पुरेशी नसतात, तर ती धोरणे नागरिक आणि शासकीय कर्मचाऱ्यांपर्यंत किती कार्यक्षमतेने, पारदर्शकतेने आणि सहजतेने पोहोचतात हे जाणून घेणे सुद्धा महत्वाचे असते. महाराष्ट्र राज्याची डिजिटल प्रशासकीय परिसंस्था अधिक सक्षम होत असताना, महाआयटी बहुविध परिवर्तनकारी उपक्रमांच्या माध्यमातून या परिसंस्थेला पुरक उपक्रम यशस्वीपणे राबवून, परिसंस्था परिपूर्ण करण्याच्या कामी मोलाचा हातभार लावते आहे.

शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणाली (GQMS) हा असाच एक उपयुक्त उपक्रम असून, या प्रणालीमुळे शासकीय निवासस्थानांचे व्यवस्थापन आणि वाटप प्रक्रियेचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागासाठी महाआयटीने विकसित केलेली ही प्रणाली, अनेक दशकांपासून मोठ्या प्रमाणावर हस्तलिखित स्वरूपात असलेल्या प्रशासकीय प्रक्रियेचे डिजिटायझेशन करणारी आहे, ज्यामुळे घरांचे वाटप अधिक जलद, अधिक न्याय्य आणि अधिक पारदर्शक होते.

## परिवर्तनाची आवश्यकता

शासकीय निवासस्थान ही विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वाची सुविधा आहे. घरांची मागणी प्रचंड असणाऱ्या मुंबई शहर आणि उपनगरामध्ये हजारो अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थानांच्या शोधात असतात.

शासकीय निवासस्थानांच्या पारंपरिक वाटप प्रक्रियेमध्ये अनेक कार्यपद्धतींचा समावेश होता. अर्ज प्रत्यक्ष सादर केले जात, नोंदी वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये ठेवल्या जात, अनेक प्रशासकीय स्तरांवर मंजुरीची गरज भासत असे, आणि उपलब्ध निवासस्थानांची माहिती अनेकदा विभागांमध्ये विखुरलेली असल्यामुळे सहज चटकन उपलब्ध होत नसे.

अर्जदारांना त्यांच्या अर्जांच्या स्थितीबद्दल जाणून घेणे सहजसाध्य नव्हते, तर अधिकाऱ्यांना अद्ययावत नोंदी ठेवणे, पात्रतेची पडताळणी करणे, विभागांमध्ये समन्वय राखणे आणि वेळेवर शासकीय निवासस्थान वाटप सुनिश्चित करणे जिकीरीचे ठरत असे. त्याचबरोबर मध्यवर्ती डिजिटल नोंदींच्या अभावामुळे प्रशासकीय कामाचा भार सातत्याने वाढत होता.

या कामातील आव्हानांची दखल घेऊन, महाराष्ट्र शासनाने आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून संपूर्ण गृहनिर्माण वाटप प्रणालीची पुनर्रचना करण्याची जबाबदारी 'महाआयटी'वर सोपवली.

## डिजिटल परिवर्तनाची सुरुवात

केवळ विद्यमान कार्यपद्धतींचे संगणकीकरण करण्याऐवजी, महाआयटीने संपूर्ण कार्यप्रवाहाची मुळापासून पुनर्रचना करून एक व्यापक दृष्टिकोन स्वीकारला.

महाआयटीने विकसित केलेली शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणाली (GQMS) हा एक सुरक्षित, बुद्धिमान, आणि कार्यप्रवाहाधारित डिजिटल मंच असून तो शासकीय निवासस्थान वाटपाच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्याचे स्वयंचलीकरण करतो आणि त्याच वेळी शासकीय नियम व धोरणांचे पालन सुनिश्चित करतो.

ही प्रणाली अर्जदार, प्रशासकीय विभाग, मंजुरी देणारे अधिकारी आणि संनियंत्रण संस्थांना एकीकृत परिसंस्थेत सामावून घेणारा डिजिटल मंच म्हणून काम करते.

## डिजिटल निवासस्थान वाटप चक्र

संपूर्ण निवासस्थान वाटप चक्राचे डिजिटायझेशन करण्याची क्षमता ही GQMS ची सर्वात मोठी ताकद होय.

पात्र शासकीय कर्मचारी आता अनेक कार्यालयांना भेट न देता ऑनलाइन अर्ज सादर करू शकतात. हा मंच अधिकृत कर्मचारी नोंदींसोबत एकत्रीकरणाच्या माध्यमातून अर्जदारांच्या तपशिलांची पडताळणी करतो, ज्यामुळे चुका कमी होतात आणि कागदपत्रांची वारंवार पडताळणी करण्याची गरज संपुष्टात येते.

अर्जदारांना त्यांच्या पसंतीच्या निवासस्थानांची निवड ऑनलाइन करण्याची सुविधा प्राप्त होते, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक सोयीस्कर आणि पारदर्शक बनते. प्रत्येक अर्ज पूर्वनिर्धारित डिजिटल कार्यप्रवाहांमधून पुढे जातो, त्यायोगे अनावश्यक विलंबाशिवाय प्रमाणित कार्यपद्धतीनुसार मंजुरी प्राप्त होण्याची खातरजमा होते.

गृहनिर्माण वाटपामध्ये निष्पक्षता वाढवण्यासाठी GQMS मध्ये शासनाने निश्चित केलेल्या धोरणांवर आधारित प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर आधारित एक स्वयंचलित वाटप यंत्रणा समाविष्ट आहे.

वाटप प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप कमी करून, नियमांनुसार शासकीय निवासस्थानांचे वाटप केले जाईल, याची खातरजमा ही प्रणाली करते.

या स्वयंचलनामुळे सुसंगतीमध्ये लक्षणीय सुधारणा दिसून येते, तसेच ही प्रक्रिया वस्तुनिष्ठ आणि न्याय्य असल्याचा अर्जदारांमधील विश्वास वाढतो.

## रिअल-टाइम डिजिटल डॅशबोर्ड

आधुनिक प्रशासनासाठी वेळेवर माहिती प्राप्त होणे आवश्यक असते. GQMS प्रणाली विविध भागधारकांसाठी समर्पित डॅशबोर्ड प्रदान करते, ज्यामध्ये खालील घटकांचा समावेश आहे:

- शासकीय निवासस्थानांसाठी अर्ज करणारे सरकारी कर्मचारी
- सामान्य प्रशासन विभाग (GAD)
- सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)
- मंजुरीसाठी जबाबदार असलेले प्रशासकीय अधिकारी

हे डॅशबोर्ड अर्जांची सद्यस्थिती, उपलब्ध निवासस्थाने, ताब्याचा तपशील, प्रलंबित मंजुरी आणि वाटपाच्या प्रगतीबद्दल वास्तविक माहिती देतात.
निर्णय घेणाऱ्यांना वेगवेगळ्या कार्यालयांमधील अनेक अहवालांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी, सर्व महत्त्वपूर्ण माहिती एकात्मिक डिजिटल इंटरफेसद्वारे त्वरित उपलब्ध होते, ज्यामुळे जलद प्रशासकीय निर्णय घेतले जातात, आणि उत्तम समन्वय साधता येतो.

अनेक विभागांमध्ये प्रत्यक्ष फायलींची होणारी देवाणघेवाण, हे, पारंपारिक प्रशासकीय प्रणालींमध्ये होणाऱ्या विलंबाचे एक मुख्य कारण होते. या किचकट प्रक्रियेऐवजी GQMS मध्ये पूर्णपणे डिजिटल मंजुरी कार्यप्रणाली उपलब्ध आहे.

आवेदकांचे अर्ज नियुक्त मंजुरी प्राधिकरणांमार्फत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पुढे जातात, ज्यामुळे प्रक्रियेचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होतो आणि प्रत्येक कृतीची डिजिटल नोंद सुनिश्चित होते.

याचा परिणाम म्हणजे जास्त जलद, अधिक जबाबदार आणि अत्यंत कार्यक्षम प्रशासकीय प्रक्रिया.

कार्यक्षम निवासस्थान व्यवस्थापनासाठी उपलब्ध मालमत्तांवर सतत देखरेख ठेवणे आवश्यक आहे.

GQMS मंच खालील बाबींचे ऑनलाइन व्यवस्थापन करतो:

- उपलब्ध निवासस्थाने
- वापरातील निवासस्थाने
- रिक्त निवासस्थाने
- ताबा स्थिती
- निवासस्थान सूची

GQMS प्रणालीमुळे अधिकाऱ्यांना आता शासकीय निवासस्थानांविषयी अद्ययावत माहिती उपलब्ध असते, त्यामुळे उत्तम नियोजन आणि शासकीय निवासस्थान-संबंधी पायाभूत सुविधांचा इष्टतम वापर करणे शक्य होते.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान नागरिक आणि कर्मचारी या दोन्ही घटकांना सद्यस्थिती माहिती असते, तेव्हा प्रक्रिया अधिक पारदर्शक होते.

प्रक्रियेच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर या मंचातर्फे स्वयंचलितरित्या एसएमएस सूचना पाठवल्या जातात, त्यात खालील बाबींचा समावेश असतो:

- अर्ज सादरीकरण
- पडताळणी
- वाटपाबाबत प्रगती
- वाटपाची अद्ययावत स्थिती
- निवासस्थानांचे अंतिम वाटप

अर्जदारांना आता अर्जाच्या स्थितीबद्दल जाणून घेण्यासाठी सरकारी कार्यालयांना वारंवार भेट देण्याची किंवा चौकशा करण्याची गरज नाही.

ही प्रणाली त्यांना संपूर्ण प्रक्रियेदरम्यान माहिती देत राहते.

डिजिटल प्रशासन हे कार्यक्षमतेबरोबरच उत्तरदायित्वाच्या बाबतीतही सरस आहे. GQMS मध्ये केलेल्या प्रत्येक कृतीची नोंद एका सर्वसमावेशक डिजिटल ऑडिट ट्रेलद्वारे नोंदवली जाते, ज्यामुळे प्रणालीच्या सर्व कामांचा एक परिपूर्ण आणि खराखुरा लेखाजोखा तयार होतो.

हा मंच वापरकर्त्यांच्या कृती, प्रणालीतील व्यवहार, मंजुरीची कालमर्यादा, निर्णयांचा इतिहास आणि प्रत्येक प्रशासकीय कृतीची नोंद ठेवतो, ज्यामुळे शासकीय निवासस्थान वाटप प्रक्रियेदरम्यान संपूर्ण उत्तरदायित्व आणि शोधक्षमता सुनिश्चित होते. या पारदर्शकतेमुळे प्रशासकांना कार्यप्रवाहांवर प्रभावीपणे लक्ष ठेवता येते, अधिक सहजतेने लेखापरीक्षण करता येते, प्रक्रियेतील अडथळे ओळखता येतात आणि प्रत्येक निर्णय स्थापित सरकारी धोरणे व कार्यपद्धतींशी पूर्णपणे सुसंगत असल्याची खात्री करता येते. अशा प्रकारच्या शोधक्षमतेमुळे पारदर्शकता सुधारते आणि आवश्यकतेनुसार अनुपालन पुनरावलोकने सुलभ होतात, ज्यामुळे प्रशासन अधिक सक्षम होते.

अशा प्रकारची शोधक्षमता पारदर्शकतेत सुधारणा घडवून आणते, आणि आवश्यकतेनुसार अनुपालनांचे पुनरावलोकन सुलभ करून प्रशासनाला बळकट करते.

सेवा वितरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी शासकीय विभाग अचूक माहितीवर अवलंबून असतात. GQMS मध्ये उपलब्ध असणारे

सर्वसमावेशक व्यवस्थापन माहिती प्रणाली अहवाल आणि वास्तविक माहिती प्रदान करणारे डॅशबोर्ड त्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

या सुविधांच्या आधारे निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांना एकाच एकात्मिक मंचावरून प्रलंबित अर्जांवर लक्ष ठेवता येते, वाटपाच्या स्वरूपाचे विश्लेषण करता येते, शासकीय निवासस्थानांच्या उपलब्धतेचा पाठपुरावा करता येतो, विभागनिहाय कामगिरीचे मूल्यांकन करता येतो, मंजुरीच्या कालमर्यादेचा आढावा घेता येतो, आणि ताबा दिलेल्या निवासस्थानांच्या आकडेवारीवर लक्षही ठेवता येते. या तपशिलांच्या आधारे प्रशासकांना कार्यान्वयन अडथळे ओळखणे, स्रोतांचा यथोचित वापर करणे, वेळेवर निर्णय घेणे, तसेच अचूक, वास्तविक माहितीच्या आधारे धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होते..

या विश्लेषणात्मक क्षमतांमुळे अधिकाऱ्यांना पुराव्यावर आधारित निर्णय घेणे शक्य होते, आणि शासकीय निवासस्थान व्यवस्थापना-साठी दीर्घकालीन नियोजनातही सुधारणा होते.

GQMS च्या अंमलबजावणीमुळे प्रशासनामध्ये अनेक लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत

या प्रणालीने कार्यप्रवाह स्वयंचलनाद्वारे निवासस्थान वाटप प्रक्रियेला गती देताना, हस्तलिखित दस्तऐवजीकरण आणि प्रत्यक्ष फायलींच्या हालचालींवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणावर कमी केले आहे.

नियमांवर आधारित डिजिटल प्रक्रियेमुळे निष्पक्षता आणि पारदर्शकता वाढली असून, वाटप प्रक्रियेतील संदिग्धता कमी झाली आहे.

मध्यवर्ती माहिती व्यवस्थापनामुळे डेटाची अचूकता सुधारली आहे, तर एकात्मिक कार्यप्रवाहांमुळे सामान्य प्रशासन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर विभागांमधील समन्वय अधिक सक्षम झाला आहे.

अधिकारी आता दस्तऐवजांचे व्यवस्थापन करण्यात कमी वेळ घालवतात, आणि कार्यक्षम प्रशासन व सार्वजनिक सेवा वितरणावर जास्त लक्ष केंद्रित करतात.

महाराष्ट्र शासनाने प्रशासन सुलभ करण्यासाठी, सार्वजनिक प्रशासन सुधारण्यासाठी आणि सेवा वितरण वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानामध्ये सातत्याने गुंतवणूक केली आहे.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय कर्मचाऱ्यांचा वापरकर्ता-अनुभव सुधारत असतानाच, सरकारी कामकाजाचे आधुनिकीकरणही कसे साध्य होते, हे यातून दिसून येते.

केवळ अर्जांचे डिजिटायझेशन करण्याऐवजी, हा मंच कार्यक्षमता, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि वापरकर्त्यांची सोय या बाबींना प्राधान्य देत, प्रशासकीय प्रक्रियांची पुनर्रचना करते.

हा दृष्टिकोन ई-प्रशासनाच्या पुढील पिढीचे प्रतिनिधित्व करतो.

## डिजिटल परिवर्तनाला चालना

महाराष्ट्राची मुख्य तंत्रज्ञान अंमलबजावणी संस्था म्हणून महाआयटी प्रशासकीय समस्यांचे निराकरण करणारे नाविन्यपूर्ण डिजिटल मंच तयार करत आहे.

नागरिक सेवा आणि विभागीय ऑटोमेशनपासून ते एंटरप्राइझ डिजिटल सोल्यूशन्सपर्यंत, महाआयटीने प्रशासकीय कौशल्य आणि तांत्रिक नवोपक्रम यांचा मेळ घालण्याची आपली क्षमता सातत्याने सिद्ध केली आहे.

बुद्धिमान डिजिटल प्लॅटफॉर्म जटिल प्रशासकीय प्रणालींना कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित प्रशासकीय यंत्रणेत रूपांतरित करू शकतात, हे या शासकीय निवासस्थान व्यवस्थापन प्रणालीवरून दिसून येते.

शासकीय निवासस्थाने ही केवळ एक प्रशासकीय जबाबदारी नाही, तर समाजाच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित करणाऱ्या लोकसेवकांच्या दृष्टीने ती एक महत्त्वाची आधारभूत प्रणाली आहे. GQMS च्या माध्यमातून शासकीय निवासस्थान वाटप प्रक्रियेचे डिजिटायझेशन करून, महाराष्ट्राने एक पारदर्शक, जबाबदार, कार्यक्षम आणि तंत्रज्ञान-सक्षम प्रशासकीय मॉडेल तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

येत्या काळात, GQMS सारखे मंच महाराष्ट्राच्या डिजिटलदृष्ट्या सक्षम शासनाच्या संकल्पनेला बळकट करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहतील, आणि त्यायोगे प्रशासनाच्या केंद्रस्थानी कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्कृष्ट सेवेला स्थान प्राप्त होईल.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील डेटा सेंटर्स



## हरित डेटा सेंटर्स, एआयसंबंधी स्वदेशी पायाभूत सुविधा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर करण्याचे, मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल यांचे आवाहन

महाराष्ट्र शासनाची तंत्रज्ञान-क्षमता बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागातर्फे "Tech Thursdays" हा उपक्रम राबवला जातो. भविष्यवेधी प्रशासन घडवणाऱ्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांना परिचित करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत 23 जुलै, 2026 रोजी मंत्रालयातील परिषद सभागृहात 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील डेटा सेंटर्स' या संकल्पनेवर आधारित सत्राचे आयोजन करण्यात आले. भारताच्या डिजिटल परिवर्तनामध्ये एआय-सज्ज डेटा सेंटर्सच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर चर्चा करण्यासाठी यात वरिष्ठ शासकीय अधिकारी, तंत्रज्ञ आणि उद्योजक एकत्र आले होते. या कार्यक्रमात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव श्री. वीरेंद्र सिंह यांचे स्वागतपर भाषण झाले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल यांनी अध्यक्षीय भाषणात उपस्थितांना संबोधित केले आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील जाणकारांनी मार्गदर्शन केले.



सत्रातील सहभागींचे स्वागत करताना श्री. वीरेंद्र सिंह म्हणाले की आज तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने विकसित होत आहे, आणि प्रशासनाने हे बदल समजून घेण्यासाठी आणि आत्मसात करण्यासाठी तितकेच चपळ राहिले पाहिजे. धोरणकर्ते आणि प्रशासकीय मनुष्यबळाची तांत्रिक क्षमता सातत्याने वाढवण्यासाठी 'टेक थर्सडे' सारख्या उपक्रमांची संकल्पना मांडण्यात आली आहे, जेणेकरून ते वाढत्या डिजिटल जगात माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतील, असे मत त्यांनी व्यक्त केले. नवोपक्रम हे शासन आणि सार्वजनिक सेवा वितरणाचा अविभाज्य भाग बनत आहेत, असे सांगत त्यांनी सर्व विभागांतील अधिकाऱ्यांना उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कंप्युटिंग, डेटा इन्फ्रास्ट्रक्चर आणि ऑटोमेशनमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

शासन, व्यवसाय आणि नागरिक ज्या प्रकारे डेटाशी संवाद साधतात, त्या पद्धतीत कृत्रिम बुद्धिमत्तेने आमूलाग्र बदल घडवला आहे, असे मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अधोरेखित केले. सक्षम डिजिटल पायाभूत सुविधांशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता कार्य करू शकत नाहीत, असे सांगत, डेटा सेंटर्स हे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील क्रांतीचा कणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

साध्या परंतु विचारप्रवर्तक उदाहरणांचा वापर करून, मुख्य सचिवांनी उपस्थितांना तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध संकल्पनांबद्दल वेगळ्या पद्धतीने विचार करण्यास प्रोत्साहित केले. हवामान बदल आणि एल निनोमुळे मुंबईतील पर्जन्यमानावर झालेल्या परिणामांचा संदर्भ देत त्यांनी अधिकाऱ्यांना 'क्लाउड' म्हणजे काय आहे?" असा प्रश्न विचारला. क्लाउड कंप्युटिंग ही अमूर्त संकल्पना नसून, एकमेकांशी जोडलेल्या डेटा सेंटर्सचे ते एक अत्याधुनिक नेटवर्क असते, जिथे अति-वेगवान डिजिटल नेटवर्कद्वारे अनेक ठिकाणी डेटा सुरक्षितपणे संग्रहित केला जातो, त्यावर प्रक्रिया केली जाते आणि तो प्रसारित केला जातो, असे त्यांनी स्पष्ट केले.

एआय आधारित ॲप्लिकेशन्स अधिकाधिक संगणक-केंद्रित होत असल्याने, शासनाने डिजिटल पायाभूत सुविधांच्या पर्यावरणीय परिणामांकडेही तितकेच लक्ष दिले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक डेटा सेंटर्सच्या, विशेषतः एआय वर्कलोड हाताळणाऱ्या सेंटर्सच्या, पाणी आणि ऊर्जेच्या मोठ्या गरजांकडे लक्ष वेधले गेले आहे, असे श्री. अग्रवाल यांनी सांगितले.

शाश्वत विकासावर भर देताना मुख्य सचिव म्हणाले की पर्यावरणावरील अनिष्ट परिणाम कमी करणाऱ्या प्रगत शीतकरण तंत्रज्ञानाचा अवलंब करून, नवीकरणीय ऊर्जेवर चालणारी ग्रीन डेटा सेंटर्स स्थापन करण्यात महाराष्ट्र एक अग्रणी राज्य म्हणून उदयास

येऊ इच्छिते. शाश्वतता आणि तांत्रिक विकास यांची एकत्रितपणे प्रगती झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यातील डिजिटल पायाभूत सुविधा कार्यक्षम आणि पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदार असतील, असेही मुख्य सचिवांनी नमूद केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी दृष्टिकोनावर प्रकाश टाकत श्री. अग्रवाल यांनी स्वदेशी संगणकीय पायाभूत सुविधांनी सज्ज असलेल्या 'महाएआय' या महाराष्ट्राच्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेच्या विकसनाविषयी माहिती दिली. प्रशासनासाठी सुरक्षित, विस्तारक्षम आणि सार्वभौम डिजिटल पायाभूत सुविधा सक्षम करण्याकरिता "आपले स्वतःचे सर्व्हर्स आणि आपली स्वतःची कृत्रिम बुद्धिमत्ता" विकसित करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. शासकीय अधिकाऱ्यांनी एजेंटिक एआयबाबत जाणून घ्यावे, असे आवाहन करतानाच, शासनाला निर्णय-प्रक्रिया, कार्यप्रवाह स्वयंचलन आणि नागरिक सेवा वितरणात स्वायत्तपणे मदत करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहित केले.

श्री. सलीम सय्यद, उपाध्यक्ष – एआय डेटा सेंटर डिझाइन अँड बिल्ड, श्री. अभिजित उप्पोनी, उपाध्यक्ष – एआय बिझनेस ट्रान्सफॉर्मेशन, आणि श्री. अमोद काबडे, उपाध्यक्ष – बिझनेस ऑपरेशन्स यांनी तांत्रिक सत्रांना संबोधित केले. या तज्ञांनी भविष्यवेधी एआय-सज्ज डेटा सेंटर्सबाबत सादरीकरण केले, तसेच संगणकीय घनता, जीपीयू-आधारित प्रक्रिया आणि उच्च-कार्यक्षमता नेटवर्किंगच्या संदर्भात एआय-पायाभूत सुविधा पारंपरिक डेटा सेंटर्सपेक्षा कशाप्रकारे वेगळ्या आहेत, हे स्पष्ट केले. ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स (GPUs) चे क्लस्टर्स, हाय-स्पीड इंटरकनेक्ट्स आणि प्रगत स्टोरेज आर्किटेक्चर्सच्या माध्यमातून एआय मॉडेल ट्रेनिंग आणि इन्फरन्सच्या प्रचंड संगणकीय गरजांना आधार देण्यासाठी एआय डेटा सेंटर्सची विशेष रचना केली जाते, असे त्यांनी नमूद केले.

वक्त्यांनी एआय संबंधी पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेल्या कूलिंग तंत्रज्ञानाच्या जलद उत्क्रांतीवरही चर्चा केली. आधुनिक एआय सर्व्हर्स पारंपरिक संगणकीय प्रणालींपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त औष्णिक भार निर्माण करत असल्याने, ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी, पाण्याचा वापर कमी करण्यासाठी आणि कार्यान्वयन विश्वसनीयता सुनिश्चित करण्यासाठी लिक्विड कूलिंग आणि इतर प्रगत थर्मल मॅनेजमेंट सोल्यूशन्सची आवश्यकता भासते आहे. पर्यावरणावरील विपरित परिणाम कमी करून भविष्यातील एआय ॲप्लिकेशन्सना आधार देण्यास सक्षम असलेल्या शाश्वत एआय-रेडी डेटा सेंटर्सच्या डिझाइनमधील जागतिक सर्वोत्तम पद्धतींबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

संवादात्मक चर्चेदरम्यान, अधिकाऱ्यांनी एआय इन्फ्रास्ट्रक्चर, क्लाउड कंप्युटिंग, ऊर्जा-कार्यक्षम डेटा सेंटर्स, शाश्वतता, सायबर सुरक्षा आणि सरकारी तंत्रज्ञान परिसंस्थांची भविष्यातील सज्जता यांसारख्या विषयांवर तज्ञांशी संवाद साधला. या चर्चांमधून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आजच्या युगात डिजिटल पायाभूत सुविधा हे प्रशासनासाठी एक मोलाचे धोरणात्मक साधन बनले आहे, ही जाणीव प्रकर्षाने अधोरेखित झाली.



शासकीय कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय घडवणारा 'टेक थर्सडेज' हा उपक्रम म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या निरंतर क्षमता-उभारणीची पायाभरणी आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नियमितपणे होणाऱ्या सत्रांच्या माध्यमातून वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, नवोन्मेष-आधारित प्रशासनाला चालना देणे आणि डिजिटल परिवर्तनामध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व अधिक मजबूत करणे, हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट, अशा सत्रांच्या माध्यमातून साध्य होत असल्याचे निदर्शनास येते आहे.





# अधिक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवण्यासाठी सायबर मानसशास्त्राचा वेध

वर्तनशास्त्राच्या माध्यमातून डिजिटल प्रशासन बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने, 'टेक थर्सडे' उपक्रमांतर्गत नुकतेच एका विशेष सत्राचे आयोजन केले.  मंत्रालयात आयोजित या सत्राचा विषय होता, "डिजिटल सुरक्षेसाठी सायबर मानसशास्त्र: प्रशासनाचा मानवकेंद्रित दृष्टिकोन". या सत्राच्या माध्यमातून, मानवी वर्तन समजून घेत सुरक्षित, लवचिक आणि नागरिक-केंद्रित डिजिटल परिसंस्था उभारण्याबाबत विचारांची देवाण-घेवाण करण्याच्या उद्देशाने अनेक ज्येष्ठ शासकीय अधिकारी-कर्मचारी एकत्र आले.

महाराष्ट्र शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) श्री. विकास चंद्र रस्तोगी (भाप्रसे) यांच्या विशेष भाषणाने या सत्राची सुरुवात झाली. डिजिटल तंत्रज्ञान सार्वजनिक प्रशासनाला सतत नव्याने आकार देत असल्यामुळे प्रशासनामध्ये उदयोन्मुख ज्ञानक्षेत्रांना सामावून घेण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. सायबर मानसशास्त्रज्ञ आणि कॉस्मिक इंटिग्रेटेड इन्स्टिट्यूट ऑफ सायकॉलॉजी अँड सिक्युरिटीचे (CIIPS) संस्थापक आणि संचालक प्रा. राकेश कृपलानी यांनी मुख्य सत्र सादर केले. त्यानंतर नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर तर्फे महाएआय (MahaAI) बाबत सादरीकरण झाले.

डिजिटल मंच मानवी वर्तनावर कसा प्रभाव टाकतात हे समजून घेणे, हा या कार्यशाळेचा एक मुख्य उद्देश होता. जगभरातील सरकारे डिजिटल पायाभूत सुविधा आणि सायबर सुरक्षा तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असली तरी, मानवी मन हे हल्ला होण्याच्या दृष्टीने सर्वात असुरक्षित ठिकाण आहे, असे, प्रा. कृपलानी यांनी नमूद केले. आजकाल सायबर गुन्हेगार तांत्रिक त्रुटींऐवजी भीती, विश्वास, निकड आणि उत्सुकता अशा  मानवी भावनांचा अधिकाधिक गैरफायदा घेतात. त्यामुळे, नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल प्रणाली सुरक्षित करण्याइतकेच डिजिटल वर्तणूक समजून घेणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

सायबर मानसशास्त्र हे आंतरविद्याशाखीय विज्ञान आहे, असे सांगत प्रा. कृपलानी म्हणाले की तंत्रज्ञान लोकांच्या विचार करण्याच्या, अनुभवण्याच्या आणि वागण्याच्या पद्धतीवर कसा प्रभाव टाकते हे समजून घेण्यासाठी, हे शास्त्र क्लिनिकल मानसशास्त्र, बोधात्मक मज्जाशास्त्र, वर्तणूक अर्थशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, डिजिटल नीतिमत्ता आणि सायबर सुरक्षा यांना एकत्र आणते. प्रभावी डिजिटल प्रशासनाने तंत्रज्ञान-केंद्रित दृष्टिकोनांच्या पलीकडे जाऊन धोरण निर्मिती, नागरिक सेवा आणि सार्वजनिक जागरूकता-संबंधी उपक्रमांमध्ये वर्तणुकीशी संबंधित अंतर्दृष्टीचा समावेश केला पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

या सत्रात महाराष्ट्राच्या विस्तारणाऱ्या सायबर परिस्थितीचा सर्वसमावेशक आढावा सादर करण्यात आला. राज्यात नोंदवल्या जाणाऱ्या सायबर तक्रारी आणि सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या प्रकरणांची दखल या सत्रात घेण्यात आली. प्रत्येक सायबर गुन्हेगारीच्या आकडेवारीमागे अफरातफर, फसवणूक आणि मानवी स्वभावाचा गैरफायदा यांचा समावेश असलेली एक मानवी कहाणी असते, असे मत अधोरेखित करण्यात आले. सायबर घटनांकडे केवळ तांत्रिक अपयश म्हणून न पाहता, मानवी निर्णयक्षमता आणि विश्वासावर घाला घालणारे मानसिक हल्ले म्हणून पाहिले जावे, असा सूर या चर्चासत्रात उमटला.

डिजिटल मंच मानवी वर्तनाला कशा प्रकारे प्रभावित करतात, हे समजून घेणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. अनेक व्यक्ती प्रत्यक्ष जीवनातील परिस्थितींपेक्षा ऑनलाइन जगात अनेकदा वेगळ्या प्रकारे वागतात, हे विषद करताना प्रा. कृपलानी यांनी ऑनलाइन डिसइनहिबिशन इफेक्ट, सोशल प्रेझेंस थिअरी, युजेस अँड ग्रॅटिफिकेशन्स थिअरी, प्रोटियस इफेक्ट आणि कॉग्निटिव्ह लोड थिअरी अशा जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त सिद्धांतांचा दाखला दिला. अनाम ओळख, सामाजिक मान्यता, भावनिक प्रेरणा आणि माहितीचा अतिरेक हे घटक डिजिटल संवाद आणि ऑनलाइन निर्णय प्रक्रियेवर लक्षणीयरीत्या कसा प्रभाव टाकतात, हे या सत्रात स्पष्ट करण्यात आले.

डोपामाइन, कॉर्टिसोल, सेरोटोनिन आणि ऑक्सिटोसिन यांसारखी मेंदूतील रसायने ऑनलाइन सहभागाला कसा आकार देतात हे स्पष्ट

करत या कार्यशाळेत डिजिटल वर्तनामागील न्यूरोसायन्सचा मागोवाही घेण्यात आला. समाज माध्यमांवर प्राप्त होणाऱ्या सूचना, आमिषे आणि वैयक्तिकृत सामग्रीच्या माध्यमातून वापरकर्त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी वर्तणूक मानसशास्त्राचा कशा प्रकारे उपयोग केला जातो, तसेच सततच्या डिजिटल तणावामुळे एकाग्रता, निर्णयक्षमता आणि मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, यावर सुद्धा साधक-बाधक चर्चा करण्यात आली.

विविध वयोगटांतील नागरिक तंत्रज्ञानाशी वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधतात हे लक्षात घेत, या सत्रात विविध पिढ्यांसाठी सर्वसमावेशक डिजिटल सेवा तयार करण्याच्या महत्त्वावर भर देण्यात आला. ऑनलाइन फसवणुकीला बळी पडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांपासून ते सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या डिजिटल युगात वाढलेल्या तरुणांपर्यंत सर्वांचा यात समावेश होता. एकच डिजिटल धोरण सर्व पिढ्यांसाठी प्रभावीपणे उपयुक्त ठरू शकत नाही, ज्यामुळे सार्वजनिक सेवा वितरणासाठी वर्तणुकीशी संबंधित अंतर्दृष्टी अधिकाधिक महत्त्वाची ठरते, ही महत्वाची बाब या चर्चेतून अधोरेखित झाली.

शिक्षण, आरोग्य, गृह, महिला व बाल विकास, ग्रामीण विकास, माहिती तंत्रज्ञान आणि सामाजिक न्याय अशा अनेक शासकीय विभागांसाठी सायबर मानसशास्त्र कशा प्रकारे साहाय्य ठरू शकते, याबाबत सुद्धा या कार्यक्रमात चर्चा करण्यात आली. सायबर फसवणूक आणि चुकीच्या माहितीचा प्रसार रोखण्यापासून ते डिजिटल आरोग्याला प्रोत्साहन देणे, नागरिकांचा विश्वास दृढ करणे, धोरणात्मक संवाद सुधारणे आणि अधिक वापरकर्ता-केंद्रित डिजिटल मंच विकसित करण्यापर्यंतच्या अनुप्रयोगांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

डिजिटल प्रशासनाचे भवितव्य केवळ आणखी मजबूत सायबर सुरक्षा पायाभूत सुविधांवर नाही, तर मानवी वर्तनाच्या सखोल आकलनावरही अवलंबून आहे, यावर या चर्चासत्रात भर देण्यात आला. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डीपफेक्स आणि इमर्सिव्ह डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांसारखी तंत्रज्ञाने अधिकाधिक प्रचलित होत आहेत, तसतसे नागरिक जागरूकता वाढवणे, डिजिटल लवचिकता सुधारणे आणि विश्वासार्ह सार्वजनिक संस्था निर्माण करण्याच्या कामी वर्तनशास्त्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, यावर उपस्थितांचे एकमत झाले.

महाराष्ट्र शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) श्री. विकास चंद्र रस्तोगी (भाप्रसे) यांच्या विशेष भाषणाने या सत्राची सुरुवात झाली. वेगवान तांत्रिक प्रगतीला डिजिटल विश्वास, सायबर लवचिकता आणि नागरिक जागरूकतेची जोड असणे आवश्यक आहे, अशा आजच्या युगात डिजिटल प्रशासनासाठी मानवकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. वर्तणुकीशी संबंधित अंतर्दृष्टी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान एकत्रितपणे सार्वजनिक सेवा वितरण मजबूत करण्यात आणि सर्व नागरिकांसाठी एक सुरक्षित डिजिटल परिसंस्था निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, असे मतही त्यांनी व्यक्त केले.



(श्री. विकास चंद्र रस्तोगी, भाप्रसे, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन)

महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव श्री. विरेंद्र सिंह यांनी 'टेक थर्सडेज' उपक्रमामागील दृष्टीकोन विषद केला. हा उपक्रम म्हणजे प्रशासनाला आकार देणाऱ्या उदयोन्मुख प्रवृत्तींचा शोध घेण्यासाठी धोरणकर्ते, क्षेत्रातील तज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नेत्यांना एकत्र आणणारा महत्वपूर्ण मंच आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रशासन आणि नागरिक सेवांमध्ये नवोपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वर्तणूकशास्त्र यांचे एकत्रीकरण करून एक सुरक्षित, सर्वसमावेशक आणि भविष्यासाठी सज्ज डिजिटल महाराष्ट्र घडवण्याच्या, आपल्या विभागाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार त्यांनी केला.

'टेक थर्सडेज' उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रशासकीय पद्धतींबाबतचे ज्ञान सामायिक करण्याला प्रोत्साहन देत आहे, आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम, सुरक्षित व नागरिकाभिमुख महाराष्ट्र घडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेला दृढ करत आहे.



# क्षमता विकास



## समन्वयातून नेतृत्वाकडे : प्रभावी जिल्हास्तरीय अंमलबजावणीसाठी सक्षम जिल्हा समन्वयक

राज्यस्तरीय डिजिटल प्रशासनाच्या विविध योजना, धोरणे आणि तंत्रज्ञान प्रणालींची आखणी राज्य पातळीवर होत असली, तरी नागरिकांना त्यांचा प्रत्यक्ष अनुभव जिल्हा आणि स्थानिक पातळीवर येतो. त्यामुळे कोणत्याही उपक्रमाचे यश केवळ उत्कृष्ट धोरण किंवा सक्षम तंत्रज्ञानावर अवलंबून नसते. त्या उपक्रमाची जिल्हास्तरावर किती परिणामकारक अंमलबजावणी होते, क्षेत्रीय पथकांना किती योग्य मार्गदर्शन मिळते, अडचणी किती तत्परतेने सोडवल्या जातात आणि विविध यंत्रणांमध्ये किती प्रभावी समन्वय साधला जातो, यावर त्याचे खरे यश ठरते.

या संपूर्ण प्रक्रियेत जिल्हा समन्वयकाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.

जिल्हा समन्वयक म्हणजे केवळ सूचना पुढे पाठवणारी, माहिती गोळा करणारी किंवा उद्दिष्टांचा पाठपुरावा करणारी व्यक्ती नव्हे. राज्यस्तरीय यंत्रणा, जिल्हा प्रशासन, क्षेत्रीय पथके, आपले सरकार सेवा केंद्रचालक आणि नागरिक यांच्यातील तो एक महत्त्वाचा दुवा आहे. हा दुवा जितका सक्षम, संवेदनशील आणि नेतृत्वक्षम असेल, तितकी जिल्ह्याची अंमलबजावणी यंत्रणा अधिक गतिमान आणि परिणामकारक बनते.

ही गरज लक्षात घेऊन क्षमता उभारणी कक्षाने जिल्हा समन्वयकांना केवळ प्रशासकीय समन्वयक न मानता, जिल्हास्तरीय अंमलबजावणीचे नेतृत्व करणारे प्रतिनिधी म्हणून सक्षम करण्याचा प्रवास सुरू केला आहे.

### औपचारिक अधिकारांशिवाय नेतृत्व

जिल्हा समन्वयकांना अनेकदा अशा व्यक्ती आणि संस्थांसोबत काम करावे लागते, ज्या थेट त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली नसतात. शासकीय अधिकारी, तंत्रज्ञान पथके, सेवा केंद्रचालक, प्रशिक्षक, विविध संस्था आणि स्थानिक भागधारक यांच्यात समन्वय साधून अपेक्षित परिणाम घडवून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते.

अनेकदा परिणामांची जबाबदारी जिल्हा समन्वयकाकडे असते; परंतु संबंधित प्रत्येक व्यक्तीवर त्याचा औपचारिक अधिकार असतोच असे नाही.

अशा परिस्थितीत केवळ प्रक्रिया, पोर्टल, अहवाल पद्धती किंवा प्रशासकीय सूचना यांचे प्रशिक्षण पुरेसे ठरत नाही. समन्वयकाकडे प्रभावी संवाद, सक्रिय श्रवण, विश्वास निर्माण करणे, मतभेद हाताळणे, कठीण संवाद साधणे आणि योग्य वेळी योग्य पद्धतीने विषय वरिष्ठ स्तरावर मांडणे ही कौशल्येही असणे आवश्यक आहे.

या क्षमता बांधणी कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी एक महत्त्वाचा प्रश्न ठेवण्यात आला –
औपचारिक अधिकार मर्यादित असतानाही जिल्हा समन्वयक प्रभावी नेतृत्व कसे करू शकतो?
या प्रश्नातूनच प्रशिक्षणाची रचना आणि शिकण्याची पद्धत विकसित

करण्यात आली.

## जिल्ह्यातील वास्तव प्रसंगांवर आधारित प्रशिक्षण

या प्रशिक्षणात दीर्घ व्याख्याने आणि एकतर्फी माहिती देण्याऐवजी प्रत्यक्ष कामातील प्रसंगांवर आधारित संवादात्मक पद्धत स्वीकारण्यात आली आहे. प्रत्येक सत्राची सुरुवात जिल्हा समन्वयकांना त्यांच्या दैनंदिन कामात भेडसावणाऱ्या वास्तव परिस्थितीपासून होते.

उदाहरणार्थ –

- एखादा सेवा केंद्रचालक वारंवार सूचनांचे पालन करत नाही.
- जिल्हास्तरीय अधिकारी परिणामांची अपेक्षा करतात; परंतु आवश्यक सहकार्य वेळेत मिळत नाही.
- एकाच क्षेत्रीय समस्येबाबत विविध भागधारकांकडून परस्परविरोधी माहिती मिळते.
- नाते बिघडण्याच्या भीतीमुळे आवश्यक कठीण संवाद पुढे ढकलला जातो.
- समस्या वरिष्ठ स्तरावर मांडण्याची गरज असते; मात्र केव्हा आणि कशा प्रकारे मांडावी, याबाबत संभ्रम असतो.
- बैठकीत सर्वजण सहमती दर्शवितात; परंतु नंतर कृतीची जबाबदारी घेत नाहीत.
- 

प्रशिक्षणातील सहभागी प्रथम अशा प्रसंगाचे विश्लेषण करतात, विविध पर्यायांवर चर्चा करतात आणि प्रत्येक पर्यायाचे संभाव्य परिणाम तपासतात. त्यानंतर संबंधित नेतृत्व कौशल्य, तत्त्व किंवा कार्यपद्धती समोर आणली जाते.

या पद्धतीमुळे प्रशिक्षण केवळ संकल्पनात्मक राहत नाही. ते थेट कामाशी जोडले जाते. सहभागी व्यक्ती केवळ 'काय करावे' हे ऐकत नाहीत, तर 'कसे विचार करावेत', 'कोणता पर्याय का निवडावा' आणि 'त्या पर्यायाचा इतरांवर काय परिणाम होईल' याचा सराव करतात.

## टप्प्याटप्प्याने विकसित होणारा नेतृत्व प्रवास

प्रभावी नेतृत्व एका प्रशिक्षणाने निर्माण होत नाही. त्यामुळे एकदिवसीय प्रशिक्षणाऐवजी परस्पर-संलग्न सत्रांच्या मालिकेच्या स्वरूपात या उपक्रमाची रचना करण्यात आली आहे. प्रत्येक सत्र जिल्हास्तरीय नेतृत्वासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट क्षमता विकसित करते.

अधिकारांशिवाय प्रभाव निर्माण करणे – सामायिक उद्दिष्टे, विश्वासार्हता, हितसंबंधांची समज आणि योग्य संवाद यांच्या आधारे सहकार्य कसे मिळवायचे, यावर भर दिला जातो.

समजून घेण्यासाठी ऐकणे – समोरच्या व्यक्तीचे केवळ शब्द ऐकण्याऐवजी तिची खरी अडचण, अपेक्षा, चिंता किंवा मर्यादा समजून घेण्याचा सराव केला जातो.

**संवादातील स्पष्टता –** भूमिका, जबाबदाऱ्या, अपेक्षित परिणाम, कालमर्यादा आणि पुढील कृती याबाबत स्पष्ट संवाद कसा साधावा, हे लक्षात घेत काम केले जाते.

**कठीण संवाद हाताळणे –** कामातील विलंब, अपेक्षाभंग, अपुरी कामगिरी किंवा मतभेद यामुळे नाते न बिघडवता, मुद्दा न टाळता संवाद कसा साधावा, याचे मार्गदर्शन केले जाते.

**समस्या निराकरण आणि योग्य मांडणी –** कोणती समस्या स्थानिक स्तरावर सोडवता येईल, कोणती समस्या वरिष्ठ स्तरावर मांडणे आवश्यक आहे आणि ती पुराव्यांसह कशी मांडावी, याची समज विकसित केली जाते.

विश्वास निर्माण करणे – सातत्य, पारदर्शकता, प्रतिसादक्षमता आणि परस्पर सन्मान यांच्या आधारे दीर्घकालीन व्यावसायिक संबंध कसे उभे राहतात, यावर भर दिला जातो.

ही कौशल्ये स्वतंत्र नसून जिल्हास्तरीय अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी आवश्यक असलेली एकात्मिक नेतृत्व व्यवस्था आहे.

## सहभागातून शिकण्याची प्रक्रिया

या सत्रांची रचना पूर्णपणे सहभागात्मक आहे. सहभागी व्यक्तींना प्रश्न विचारण्यासाठी, स्वतःचे अनुभव मांडण्यासाठी, गृहितके तपासण्यासाठी आणि विविध कार्यपद्धतींची तुलना करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

यामुळे जिल्हा समन्वयक केवळ प्रशिक्षणाचे लाभार्थी राहत नाहीत. ते स्वतःच्या अनुभवातून सामूहिक ज्ञान निर्माण करणारे सहनिर्माते बनतात.

एका जिल्ह्याने सेवा केंद्रचालकांना प्रभावीपणे सहभागी करण्याची पद्धत विकसित केलेली असू शकते. दुसऱ्या जिल्ह्याने नियमित पाठपुराव्याची यंत्रणा उभारलेली असू शकते. तिसऱ्या जिल्ह्याने एखाद्या संवेदनशील भागधारकाशी असलेला गुंतागुंतीचा संवाद परिणामकारकरीत्या हाताळलेला असू शकतो. अशा अनुभवांची देवाणघेवाण झाल्यामुळे शिकण्याची प्रक्रिया अधिक वास्तववादी, उपयुक्त आणि समृद्ध होते.

या प्रक्रियेतून केवळ वैयक्तिक क्षमता विकसित होत नाही, तर जिल्हास्तरीय अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा एक शिकणारा समुदायही निर्माण होतो.

## माहितीपासून कृतीकडे

क्षमता उभारणीचे यश केवळ उपस्थिती, सत्रांची संख्या किंवा सहभागींच्या समाधानावर मोजता येत नाही. प्रशिक्षणानंतर दैनंदिन कामकाजात काय बदल झाला, हे अधिक महत्त्वाचे आहे.

म्हणून प्रत्येक सत्रानंतर जिल्हा समन्वयकांना एक किंवा दोन ठोस पद्धती प्रत्यक्ष कामात वापरण्यास प्रोत्साहित केले जाते.

उदाहरणार्थ -

- उपाय सुचवण्यापूर्वी योग्य प्रश्न विचारणे;
- बैठकीच्या शेवटी जबाबदाऱ्या आणि पुढील कृती स्पष्ट करणे;
- कठीण संवाद टाळण्याऐवजी त्याची पूर्वतयारी करणे;
- विविध भागधारकांचे हितसंबंध समजून घेणे;
- विषय वरिष्ठ स्तरावर मांडण्यापूर्वी क्षेत्रीय पुरावे संकलित करणे;
- ठरलेल्या कृतींचा सातत्यपूर्ण पाठपुरावा करणे.

कामातील अशा छोट्या बदलांचा जिल्हास्तरीय अंमलबजावणीवर मोठा परिणाम होऊ शकतो. प्रभावी श्रवणामुळे गैरसमज टाळता येतात. स्पष्ट संवादामुळे पुनःपुन्हा पाठपुरावा करण्याची गरज कमी होते. योग्य मांडणीमुळे समस्या लवकर सुटतात. विश्वास वाढल्यामुळे औपचारिक अधिकार मर्यादित असतानाही सहकार्य मिळते.

## क्षमता वृद्धिंगत करणारे जिल्हा नेतृत्व

या उपक्रमाचा दीर्घकालीन उद्देश केवळ स्वतंत्र जिल्हा समन्वयकांची कार्यक्षमता वाढवणे हा नाही. एक सक्षम जिल्हा समन्वयक संपूर्ण जिल्हास्तरीय व्यवस्थेची क्षमता वाढवू शकतो.

तो क्षेत्रीय पथकांना मार्गदर्शन करू शकतो, सेवा केंद्रचालकांना सक्षम करू शकतो, प्रशिक्षणाच्या गरजा ओळखू शकतो, नागरिकांच्या अडचणी व्यवस्थेपर्यंत पोहोचवू शकतो आणि राज्यस्तरीय निर्णयप्रक्रियेला वास्तविक क्षेत्रीय माहिती उपलब्ध करून देऊ शकतो.

अशा प्रकारे जिल्हा समन्वयक स्वतः प्रत्येक समस्या सोडवणारा अधिकारी न राहता, इतरांना जबाबदारी स्वीकारण्यास, योग्य निर्णय घेण्यास आणि त्यांच्या स्तरावर समस्या सोडवण्यास सक्षम करणारा क्षमता गुणक बनतो.

यामुळे जिल्हास्तरीय व्यवस्था केवळ वारंवार मिळणाऱ्या सूचनांवर अवलंबून राहत नाही. ती सामायिक समज, जबाबदारी आणि स्थानिक नेतृत्वाच्या आधारे अधिक स्वयंपूर्णपणे कार्य करू लागते.

## सतत शिकणारी अंमलबजावणी व्यवस्था

डिजिटल प्रशासनाचे स्वरूप सतत बदलत आहे. नवीन सेवा सुरू होत आहेत, तंत्रज्ञान प्रणाली अद्ययावत होत आहेत, नागरिकांच्या अपेक्षा वाढत आहेत आणि क्षेत्रीय अडचणींचे स्वरूपही बदलते आहे.

प्राप्त परिस्थितीत जिल्हा पथकांना केवळ एकदाच दिलेल्या प्रशिक्षणावर अवलंबून राहता येणार नाही. त्यांना नियमित सत्रे, समान अनुभवांची देवाणघेवाण, व्यवहार्य साधने आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांचा समावेश असलेली प्रशिक्षण व्यवस्था आवश्यक आहे. जिल्हा समन्वयकांसोबत क्षमता उभारणी कक्षाने सुरू केलेला हा उपक्रम अशा सातत्यपूर्ण शिकणाऱ्या व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

केवळ प्रक्रियेचे पालन करणारे समन्वयक घडवणे, हा या उपक्रमाचा उद्देश नाही. स्थानिक परिस्थिती समजून घेणारे, विविध व्यक्तींना एकत्र आणणारे, अडचणींना संवेदनशीलतेने प्रतिसाद देणारे आणि नागरिकांना मिळणाऱ्या परिणामांना केंद्रस्थानी ठेवणारे जिल्हास्तरीय नेतृत्व विकसित करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

जिल्हा समन्वयक नेतृत्वक्षम झाले की जिल्हा पथकांचा आत्मविश्वास वाढतो. समन्वय अधिक उद्देशपूर्ण होतो. समस्या वेळेवर समोर येतात. भागधारकांमध्ये स्पष्टता आणि जबाबदारी वाढते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नागरिकांना अधिक प्रतिसादक्षम, विश्वासार्ह आणि परिणामकारक सेवा व्यवस्था अनुभवता येते.

राज्यव्यापी उपक्रमांचे भविष्य केवळ अधिक सक्षम तंत्रज्ञानाने किंवा अधिक कठोर सूचनांनी घडणार नाही. धोरणांमागील उद्देश प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करणाऱ्या सक्षम जिल्हास्तरीय नेतृत्वामुळे ते घडेल. अर्थात, जिल्हा समन्वयकांचे सक्षमीकरण हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून, प्रभावी सार्वजनिक सेवा वितरणासाठी आवश्यक असलेल्या नेतृत्व व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण गुंतवणूक आहे.

# सुशासनामागील बुद्धिमत्ता



## डेटा ॲनालिटिक्स ॲज अ सर्व्हिस (DAaS) च्या माध्यमातून महाराष्ट्र डेटा-आधारित शासन व्यवस्था उभारत आहे

आजच्या डिजिटल युगात "डेटा हे नवे इंधन आहे" असे म्हटले जाते आणि हाच डेटा शासनासाठी अधिक मौल्यवान आहे, कारण तो माहितीवर आधारित बुद्धिमत्तेच्या सहाय्याने प्रभावी प्रशासनाचे रुपांतर सुशासनात करतो.

गेल्या दोन दशकांत जगभरातील शासन व्यवस्थांनी डिजिटल परिवर्तनासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. लाखो शासकीय नोंदी डिजिटल स्वरूपात उपलब्ध होऊन हजारो सार्वजनिक सेवा ऑनलाइन झाल्या आणि नागरिकांचा शासनाशी संवादही मोठ्या प्रमाणात डिजिटल माध्यमातून होऊ लागला. मात्र केवळ सेवांचे डिजिटायझेशन म्हणजे प्रभावी शासन ठरत नाही.

सरकारकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असली तरी काही मूलभूत प्रश्नांची अचूक उत्तरे मिळणे अनेकदा कठीण ठरते. उदाहरणार्थ कोणत्या शासकीय योजना अपेक्षित परिणाम साध्य करत आहेत? कोणत्या जिल्ह्यांमध्ये तातडीच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे? सार्वजनिक स्रोतांचा अपुरा वापर कुठे होत आहे? फसवणूक घडण्यापूर्वी ती कशी ओळखता येईल? शासनाच्या मदतीची सर्वाधिक गरज असलेले नागरिक कोण आहेत? या प्रश्नांची उत्तरे अधिक डेटा संकलित करण्यात नसून, आधीपासून उपलब्ध असलेल्या डेटाचा प्रभावी वापर करण्यात आहेत.

याच परिवर्तनाची गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित - महाआयटीच्या माध्यमातून 'डेटा ॲनालिटिक्स ॲज अ सर्व्हिस' (DAaS) हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला आहे.

DAaS हा केवळ एक तांत्रिक मंच नाही, तर शासन व्यवस्थेचा एक नवा दृष्टिकोन आहे. या उपक्रमात डेटा ही राज्याची धोरणात्मक सार्वजनिक संपत्ती मानली जाते, डेटा विश्लेषण ही शासनाची सामायिक क्षमता बनते आणि पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रिया ही धोरणनिर्मितीचा पाया ठरते.

दि. 16 जुलै 2026 रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते DAaS चे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या डिजिटल प्रवासात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. हा उपक्रम महाराष्ट्राला डिजिटल शासनातून बुद्धिमान शासन व्यवस्थेकडे घेऊन जाणारा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे निर्णय केवळ अनुभव किंवा अंदाजाच्या आधारावर नव्हे, तर सुरक्षित, एकात्मिक आणि प्रगत डेटा विश्लेषणातून उपलब्ध होणाऱ्या वास्तविक माहितीच्या आधारे घेतले जातील.

## डिजिटायझेशन पलीकडे शासन व्यवस्थेची उत्क्रांती

ई-गव्हर्नन्सच्या पहिल्या टप्प्यात शासनाच्या विविध प्रक्रिया डिजिटल करण्यात आल्या. विविध विभागांनी ऑनलाइन पोर्टल्स विकसित केली, कार्यप्रवाह स्वयंचलित केले आणि नागरिकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सेवा उपलब्ध करून दिल्या. या सुधारणांमुळे कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवांची सुलभता मोठ्या प्रमाणात वाढली.

आपले सरकार, महाडीबीटी, MAITRI 2.0, डिजिटल कोषागार प्रणाली, भूमिअभिलेख आधुनिकीकरण तसेच विविध नागरिकाभिमुख डिजिटल सेवांच्या माध्यमातून महाराष्ट्राने देशात डिजिटल परिवर्तनात अग्रणी राज्य म्हणून आपली ओळख निर्माण केली.

मात्र डिजिटल शासनाच्या दुसऱ्या टप्प्यातील उद्दिष्ट वेगळे आहे. आता केवळ डिजिटल प्रणाली निर्माण करणे हे उद्दिष्ट नसून, त्या प्रणालींमधून बुद्धिमान माहिती निर्माण करणे जास्त महत्त्वाचे आहे.

नागरिक आणि शासन यांच्यातील प्रत्येक व्यवहारातून महत्त्वपूर्ण माहिती निर्माण होते. प्रत्येक शासकीय योजनेतून अंमलबजावणीसंबंधी मौल्यवान निरीक्षणे प्राप्त होतात. प्रत्येक डिजिटल व्यवहारामध्ये सार्वजनिक धोरण अधिक प्रभावी बनविण्याची क्षमता दडलेली असते. एकत्रितपणे पाहता हा डेटा राज्याच्या सर्वात मौल्यवान संपत्तींपैकी एक आहे.

मात्र ही माहिती विविध विभागांमध्ये स्वतंत्र स्वरूपात साठविलेली असल्यास तिचा पूर्ण लाभ मिळत नाही. विभागनिहाय वेगवेगळ्या प्रणालींमध्ये विखुरलेला डेटा निर्णय प्रक्रियेत विसंगती निर्माण करू शकतो, प्रयत्नांची पुनरावृत्ती वाढवू शकतो आणि एकसंध धोरणनिर्मितीत अडथळे निर्माण करू शकतो.

याच आव्हानावर मात करण्यासाठी DAaS हा उपक्रम स्वतंत्र विभागांतील माहितीचे रूपांतर एकात्मिक, परस्परसंबंधित आणि बुद्धिमान माहिती प्रणालीमध्ये करतो.




महाराष्ट्राची डिजिटल पायाभूत रचना आणि DAaS ची सामायिक विश्लेषण प्रणाली

DAaS हा स्वतंत्र उपक्रम नसून, गेल्या दशकभरात महाराष्ट्राने साध्य केलेल्या व्यापक डिजिटल परिवर्तनाचा पुढचा टप्पा आहे.

आज महाराष्ट्राकडे देशातील सर्वाधिक समृद्ध सार्वजनिक डिजिटल परिसंस्था उपलब्ध आहे. महासारथी, आपले सरकार, महाडीबीटी, MAITRI 2.0, सेवार्थ, शालार्थ, भूमिअभिलेख प्रणाली, कोषागार व्यवस्था, परिवहन विभागाचे डेटाबेस, सार्वजनिक वितरण प्रणाली, उद्योग विभागाच्या विविध डिजिटल प्रणाली तसेच इतर विभागांच्या माध्यमातून दररोज मोठ्या प्रमाणात संरचित माहिती निर्माण होत आहे.

या मजबूत डिजिटल पायाभूत सुविधांमुळे राज्याला एक अभूतपूर्व संधी उपलब्ध झाली आहे. या सर्व प्रणाली स्वतंत्र प्रकल्प म्हणून न पाहता, त्यांना एका समान विश्लेषणात्मक चौकटीत एकत्र आणण्याचा महाराष्ट्र शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांमधील माहितीचे एकत्रितपणे विश्लेषण करता येईल. तसेच माहितीची सुरक्षितता, गोपनीयता आणि सुयोग्य प्रशासनाची तत्त्वेही कायम राखली जातील.

यामुळे अशी शासन व्यवस्था विकसित होईल, जिथे माहिती परस्परसंबंधित असेल, निर्णय पुराव्यावर आधारित असतील आणि प्रशासन अधिक गतिमान, परिणामकारक व नागरिकाभिमुख बनेल.

## शासन व्यवस्थेतील नवा दृष्टिकोन: विश्लेषणासाठी सामायिक सेवा

'विश्लेषणासाठी सामायिक सेवा संकल्पना' हे DAaS चे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय. आजवर प्रत्येक शासकीय विभाग डेटा विश्लेषणासाठी आवश्यक सॉफ्टवेअर, डॅशबोर्ड आणि अहवाल प्रणाली स्वतंत्रपणे विकसित करत असे. त्यामुळे विभागनिहाय गरजा पूर्ण होत असल्या तरी अनेक समस्या निर्माण होत होत्या. एकाच प्रकारच्या कामांची पुनरावृत्ती, वेगवेगळ्या विश्लेषण पद्धती, अधिक खर्च आणि सुसंगततेचा अभाव ही त्यातील प्रमुख आव्हाने होती.

DAaS या विखुरलेल्या पद्धतीऐवजी संपूर्ण राज्यासाठी एकसंध आणि सामायिक विश्लेषण प्रणाली विकसित करत आहे. यामध्ये प्रत्येक विभागाने स्वतंत्र विश्लेषण प्रणाली उभारण्याऐवजी महाआयटी राज्यस्तरीय विश्लेषण क्षमता उपलब्ध करून देईल. संबंधित विभाग आपल्या गरजेनुसार या सुविधांचा वापर करू शकतील.

या प्रणालीमुळे डेटाचे प्रमाणीकरण होईल, कामगिरी निर्देशांक विकसित होतील, प्रशासनासाठी समान कार्यपद्धती तयार होईल, विविध विभागांना पुनर्वापर करता येतील, अशा विश्लेषण सेवा उपलब्ध होतील.

या संकल्पनेचा मूलमंत्र अत्यंत स्पष्ट आहे, "एकदाच विकसित करा, वारंवार वापर करा."

ही संकल्पना क्लाऊड कॉम्प्युटिंगच्या उत्क्रांतीसारखीच आहे. ज्या प्रकारे संस्थांनी स्वतंत्र संगणकीय पायाभूत सुविधा उभारण्याऐवजी सामायिक क्लाऊड प्लॅटफॉर्म स्वीकारले, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन आता डेटा विश्लेषणासाठीही सामायिक राज्यस्तरीय व्यवस्था निर्माण करत आहे.

यामुळे विभागांचा वेळ स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात खर्च न होता, मिळालेल्या विश्लेषणात्मक निष्कर्षांचा वापर करून प्रशासन अधिक परिणामकारक करण्यावर केंद्रित होईल.

## माहितीचे कृतीत रूपांतर : निर्णयक्षम आणि दूरदृष्टीपूर्ण शासनाकडे वाटचाल

डेटाचा उपयोग प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत आणि कृतीत केला जातो, तेव्हाच डेटाचे खरे मूल्य सिद्ध होते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील लाखो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या एखाद्या कल्याणकारी योजनेचा विचार करू. पारंपरिक अहवालांमध्ये किती निधी वितरित झाला किंवा किती

अर्ज मंजूर झाले, याची माहिती मिळते. परंतु प्रगत डेटा विश्लेषण यापुढे जाऊन अधिक महत्त्वाचे प्रश्न विचारते.

उदा. अधिक निधी उपलब्ध असूनही कोणत्या जिल्ह्यांमध्ये योजनेचा वापर कमी आहे? कोणते सामाजिक किंवा आर्थिक घटक अद्यापही योजनांच्या लाभापासून वंचित आहेत? लाभार्थ्यांच्या नोंदींमध्ये पुनरावृत्ती आहे का? कोणती अंमलबजावणी पद्धत अधिक परिणामकारक ठरत आहे? भविष्यातील मागणीचा अंदाज आधीच घेऊन स्रोतांचे नियोजन करता येईल का? अनियमित व्यवहारांच्या आधारे संभाव्य गैरव्यवहार किंवा फसवणूक आधीच ओळखता येईल का?

हे केवळ तांत्रिक प्रश्न नाहीत; तर सार्वजनिक निधीचा अधिक परिणामकारक वापर होऊन शासनाच्या योजनांचा लाभ योग्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. DAaS या सर्व बाबींचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक, निदानात्मक, पूर्वानुमानात्मक आणि पुढील टप्प्यात मार्गदर्शक विश्लेषण एकाच एकात्मिक चौकटीत उपलब्ध करून देते.

सर्वसमावेशक विश्लेषण सेवा हे DAaS चे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य असून या माध्यमातून विविध स्तरांवरील प्रशासनाला त्यांच्या गरजेनुसार विश्लेषणात्मक माहिती उपलब्ध होईल.

धोरणकर्त्यांसाठी विशेष डॅशबोर्ड : वरिष्ठ धोरणकर्त्यांना केवळ सांख्यिकीय आकडेवारी नाही तर योजनांच्या प्रत्यक्ष परिणामांचे मूल्यांकन करणारे परिणामाभिमुख डॅशबोर्ड उपलब्ध होतील. त्यामुळे निर्णय अधिक वेगाने आणि अचूकपणे घेणे शक्य होईल.

नागरिक विश्लेषण:- विविध शासकीय डेटाबेसमधील माहिती एकत्रित करून नागरिकांच्या गरजा अधिक प्रभावीपणे समजून घेता येतील. त्यानुसार सेवा वितरणाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुधारता येईल.

थेट लाभ हस्तांतरण:- विविध योजनांची परिणामकारकता, लाभार्थींची व्याप्ती, निधीचा वापर आणि योजनांच्या अंमलबजावणीतील कार्यक्षमता यांचे सखोल विश्लेषण करता येईल.

व्यवसाय व उद्योग विश्लेषण:- M A I T R I सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून औद्योगिक गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकासाशी संबंधित माहितीचे विश्लेषण करून विकास नियोजन अधिक प्रभावी करता येईल.

भौगोलिक माहिती विश्लेषण:- भूमिअभिलेख, उपग्रह माहिती आणि भौगोलिक डेटाचे एकत्रित विश्लेषण करून पायाभूत सुविधा नियोजन, नैसर्गिक स्रोतांचे व्यवस्थापन आणि विकास आराखड्यांची अचूक अंमलबजावणी करता येईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पूर्वानुमानात्मक विश्लेषण:- कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग आधारित विश्लेषणाच्या साहाय्याने भविष्यातील गरजा, संभाव्य आव्हाने आणि विकासाचे कल जाणून घेता येतील. त्यामुळे शासन समस्या उद्भवल्यानंतर प्रतिसाद देण्याऐवजी, संभाव्य परिस्थितीच्या पूर्वानुमानानुसार आवश्यक उपाययोजना करू शकेल.

या सर्व सुविधांमुळे शासनाची कार्यपद्धती केवळ अहवाल तयार करण्यापुरती मर्यादित न राहता पूर्वनियोजन, दूरदृष्टी आणि पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रियेवर आधारित होईल.

आज जगभरातील अनेक देश सार्वजनिक प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत आहेत. मात्र कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया दर्जेदार डेटा, सक्षम प्रशासन व्यवस्था आणि प्रभावी डेटा गव्हर्नन्सवर आधारित असतो, तेव्हाच तो विश्वासार्ह ठरतो. DAaS हीच भक्कम पायाभरणी महाराष्ट्रात निर्माण करत आहे.

## जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता, विभागीय समन्वय आणि महाआयटीची भूमिका

DAaS ची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेकडे केवळ स्वतंत्र तंत्रज्ञान म्हणून न पाहता, ती सुदृढ डेटा विश्लेषण परिसंस्थेचा अविभाज्य घटक म्हणून विकसित करण्यात येत आहे.
महाराष्ट्र शासनाने A I चा वापर करताना डेटाची गुणवत्ता, प्रमाणीकरण, सुशासन आणि उत्तरदायित्व या मूलभूत तत्त्वांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यामुळे AI ही मानवी निर्णयप्रक्रियेची जागा घेणारी प्रणाली नसून, निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांना सक्षम करणारे प्रभावी सहाय्यक साधन म्हणून कार्य करेल.

पूर्वानुमानात्मक विश्लेषणाच्या माध्यमातून भविष्यातील प्रवाह ओळखता येतील. मशीन लर्निंग मॉडेल्स संभाव्य अनियमितता आणि अपवादात्मक बाबी शोधू शकतील. बुद्धिमान डॅशबोर्ड आवश्यक हस्तक्षेपांची शिफारस करू शकतील.

मात्र अंतिम धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाकडेच राहील. हे निर्णय अधिक विश्वासार्ह माहिती, सखोल विश्लेषण आणि ठोस पुराव्यांच्या आधारे घेतले जातील.

हा संतुलित दृष्टिकोन महाराष्ट्र शासनाच्या जबाबदार, पारदर्शक आणि विश्वासार्ह कृत्रिम बुद्धिमत्ता वापराच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. आधुनिक शासन व्यवस्थेत प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे कार्य करणे अपेक्षित नाही. विकासाच्या संदर्भात प्रत्येक विभागाचा इतर अनेक क्षेत्रांशी थेट संबंध असतो.
शिक्षणाची गुणवत्ता आरोग्याशी निगडित असते, कृषी उत्पादनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो, पायाभूत सुविधांचा औद्योगिक गुंतवणुकीवर प्रभाव पडतो, सामाजिक कल्याण, रोजगार, वित्तीय नियोजन आणि स्थानिक स्वराज्य संस्था या परस्परपूरक क्षेत्रांशी



जोडलेल्या असतात.

D A a S  या सर्व क्षेत्रांतील माहिती एकत्रित करून त्यांच्या परस्परसंबंधांचे विश्लेषण करण्याची क्षमता उपलब्ध करून देते. यामुळे धोरणकर्त्यांना प्रत्येक विभागातील आकडेवारीपुरते मर्यादित न राहता, विविध क्षेत्रांमधील संबंध समजून घेऊन एकात्मिक, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाभिमुख धोरणे तयार करता येतील.

या माध्यमातून विभागांमध्ये समन्वय वाढेल, विकासाच्या समान उद्दिष्टांसाठी संयुक्त प्रयत्नांना चालना मिळेल आणि शासन अधिक परिणामकारक बनेल. महाराष्ट्रासारख्या विशाल, विविधतापूर्ण आणि गतिमान राज्यासाठी ही क्षमता भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

डिजिटल परिवर्तनाचा मुख्य शिल्पकार : महाआयटी

DAaS च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे महाआयटी हे महामंडळ महाराष्ट्र शासनाचे मुख्य तंत्रज्ञान भागीदार म्हणून आणखी सक्षमपणे समोर आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाआयटीने राज्य शासनासाठी सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधा, एंटरप्राइज प्लॅटफॉर्म, क्लाऊड सेवा तसेच विविध नागरिकाभिमुख डिजिटल प्रणाली विकसित करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.
DAaS मुळे महाआयटीची भूमिका केवळ तांत्रिक प्रणाली विकसित करणाऱ्या संस्थेपुरती मर्यादित राहिलेली नाही. आता ती संपूर्ण शासन व्यवस्थेला डेटा-आधारित निर्णयक्षमतेकडे नेणारी परिवर्तनकारी संस्था म्हणून कार्यरत आहे. जागतिक स्तरावरही शासनाच्या तंत्रज्ञान संस्थांची भूमिका केवळ माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापनापुरती मर्यादित न राहता, नवोन्मेष आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक प्रभावी शासन घडविणाऱ्या भागीदारांमध्ये रूपांतरित होत आहे.

महाआयटीची वाटचाल जागतिक परिवर्तनाशी सुसंगत असून, महाराष्ट्राला डिजिटल शासनाच्या पुढील टप्प्याकडे नेणारी ठरत आहे. डेटा ॲनालिटिक्स ॲज अ सर्व्हिस (DAaS) हा महाराष्ट्राच्या डिजिटल प्रवासाचा अंतिम टप्पा नसून, अधिक बुद्धिमान, परिणामकारक आणि भविष्याभिमुख शासन व्यवस्थेकडे नेणाऱ्या नव्या पर्वाची सुरुवात आहे.

## भारतासाठी नवा आदर्श – बुद्धिमान शासन व्यवस्थेच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल

अधिकाधिक शासकीय विभाग DAaS या सामायिक विश्लेषण प्रणालीचा स्वीकार करतील, तसतसे महाराष्ट्र शासन अधिक प्रगत पूर्वानुमानात्मक मॉडेल्स, एकात्मिक धोरणात्मक डॅशबोर्ड आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निर्णय सहाय्य प्रणाली विकसित करेल.
भविष्यात या उपक्रमाचा उपयोग सार्वजनिक स्रोतांचे बुद्धिमान नियोजन आणि वाटप, हवामान बदल व आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर्वतयारी, सार्वजनिक आरोग्यविषयक अंदाज आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना, पायाभूत सुविधांचे कार्यक्षम नियोजन व व्यवस्थापन, शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तावाढीसाठी विश्लेषण, आर्थिक गैरव्यवहार व फसवणुकीचे प्रगत स्तरावरील निदान या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये अधिक व्यापकपणे होऊ शकतो.

DAaS चा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे तो केवळ तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम नाही; तर तो शासन व्यवस्थेतील कार्यसंस्कृतीत परिवर्तन घडवून आणणारा उपक्रम आहे.

डेटा-आधारित शासन म्हणजे केवळ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नव्हे. त्यासाठी प्रशासन, धोरणकर्ते आणि शासकीय संस्था यांनी पुराव्यावर आधारित निर्णयप्रक्रिया स्वीकारणे, विभागांमधील समन्वय वाढविणे, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाला प्रोत्साहन देणे तसेच नागरिककेंद्रित कार्यपद्धती विकसित करणे आवश्यक आहे. हीच कार्यसंस्कृती शासनाच्या योजनांची परिणामकारकता वाढवेल आणि नागरिकांना अधिक दर्जेदार, जलद व विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देईल.

भारत डिजिटलदृष्ट्या सक्षम समाज आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करीत असताना, भविष्यात राज्यांमधील स्पर्धा केवळ पायाभूत सुविधांवर आधारित राहणार नाही. माहितीचा प्रभावी, बुद्धिमान आणि धोरणात्मक वापर करणारी राज्येच विकासात आघाडीवर राहतील.

सुशासनाचे भविष्य केवळ डिजिटायझेशनमध्ये नसून डेटाचे

कृतीयोग्य ज्ञानामध्ये, ज्ञानाचे माहितीपूर्ण निर्णयांमध्ये आणि त्या निर्णयांचे नागरिकांसाठी मोजता येण्याजोग्या सार्वजनिक मूल्यामध्ये रूपांतर करण्यात आहे, हे डेटा ॲनालिटिक्स ॲज अ सर्व्हिस (DAaS) या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राने स्पष्ट केले आहे.

या उपक्रमामुळे महाराष्ट्र देशातील डिजिटल शासन क्षेत्रातील अग्रगण्य आणि नाविन्यपूर्ण राज्यांपैकी एक म्हणून अधिक सक्षमपणे उभा राहत आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, DAaS चा अवलंब करून इतर राज्येही अधिक सक्षम, प्रतिसादक्षम आणि नागरिकाभिमुख शासन व्यवस्था उभारण्यासाठी करू शकतात.

आगामी काळात DAaS चे यश केवळ डॅशबोर्ड, आकडेवारी किंवा विश्लेषणात्मक अहवालांपुरते मर्यादित राहणार नाही. त्याचा खरा उपयोग प्रभावी आणि पुराव्यावर आधारित सार्वजनिक धोरणे, नागरिकांना अधिक जलद, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण सेवा, सार्वजनिक स्रोतांचा अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक वापर, शासन व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वात वाढ आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रातील कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल या बाबींमध्ये स्पष्टपणे दिसून येईल.

हीच बुद्धिमान शासन व्यवस्थेची खरी ओळख आहे आणि त्या दिशेने महाराष्ट्राने एक महत्त्वपूर्ण, दूरदर्शी आणि ऐतिहासिक पाऊल टाकले आहे.



# दिवंगत सुभाजित चक्रवर्ती यांच्या स्मृतीस विनम्र आदरांजली



महाआयटी परिवाराचे सदस्य सुभाजित चक्रवर्ती यांना 27 जुलै 2026 रोजी देवाज्ञा झाली. बाहवान सायबरटेकच्या वेतनपटावर कार्यरत असणारे सुभाजित हे महाआयटी परिवाराचे एक मौल्यवान सदस्य होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात निष्ठेने सेवा बजावली. व्यावसायिकता, प्रामाणिकपणा आणि कामाप्रती वचनबद्धता ही त्यांची वैशिष्ट्ये होती. शांत स्वभाव, मदत करण्यास तत्पर आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे सहकाऱ्यांच्या मनात त्यांनी आपले स्थान निर्माण केले होते.

ते एक दयाळू व्यक्ती आणि विश्वासार्ह सहकारी होते. त्यांच्या उपस्थितीने सभोवतालच्या लोकांमध्ये आपुलकी आणि आत्मविश्वास निर्माण होत असे. त्यांच्या अकाली निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीही भरून काढता येणार नाही. संपूर्ण महाआयटी परिवाराच्या वतीने, आम्ही त्यांचे शोकाकुल कुटुंब, मित्र, सहकारी आणि प्रियजनांप्रति संवेदना व्यक्त करतो.

सुभाजित आता आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी, समर्पण आणि त्यांनी आपल्या सभोवतालच्या लोकांवर टाकलेला प्रभाव आपल्याला सतत प्रेरणा देत राहील. त्यांच्या पवित्र आत्म्यास शाश्वत शांती लाभो. ओम शांती!!!

# योगदान:

**मजकूर योगदान:**
धीरेंद्र सिंग

**संपादन:**
माधुरी पांगे

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
रवींद्र गांगुर्डे
पृथ्वीराज हणमंतराव बिरादार

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे
सूर्यकांत उभे

**योगदान:**
माधुरी पांगे
दिशा खातू
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा


## आम्हाला फॉलो करा

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार


## प्रकाशक

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाउस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org